रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १९ ◆ अंक ७८
www.ramprahar.com

◆ सोमवार, ५ ऑक्टोबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

अतिक्रमणाविरोधात पनवेल मनपाचा बडगा/३

दुर्गंधीयुक्त पाणी पाताळगंगा नदीत/५

नियती देसाई हॅमर थ्रोमध्ये रायगडात अव्वल/८

## अभिजित दीपकेंसह सीजेपी कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल



**मुंबई :** सीजेपीने २ ऑक्टोबर रोजी आयोजित केलेले विनापरवाना जेल भरो आंदोलन पक्षाच्या सर्व वरिष्ठ पदाधिकाऱ्यांना भोवले आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन तसेच पोलिसांचा अधिकृत मनाई हुकूम डावलून बेकायदेशीरपणे जमाव जमवणे, सभा घेणे आणि निदर्शने केल्याप्रकरणी शिवाजी पार्क पोलिसांनी सीजेपीचे संस्थापक अभिजित दीपके, मुख्य राष्ट्रीय प्रवक्ते सौरव दास, आयोजक अजिंक्य शिंदे आणि ४०० ते ५०० अनोळखी कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल केले आहेत. परवानगी नाकारलेली असतानाही आंदोलकांनी मैदान व्यापून ध्वनिवर्धकाचा वापर केला तसेच घोषणाबाजी करून निदर्शने केली. त्यामुळे परिसरातील वाहतुकीवर परिणाम झाला आणि स्थानिक रहिवाशांच्या शांततेचा भंग झाल्याच्या हरकती नोंदवण्यात आल्या. कायदेशीर आदेशांचे उल्लंघन झाल्याने शिवाजी पार्क पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मतदार यादी शुद्धिकरणाची मागणी करणाऱ्यांचा एसआयआरला विरोध का?

### भाजप नेते आशिष शेलार यांचा दोन्ही ठाकरेंना सवाल

**मुंबई : प्रतिनिधी**

निवडणूक आयोगाकडून सुरू असलेल्या मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणावरून आणि ईव्हीएमच्या मुद्यावरून विरोधकांनी काढलेल्या गर्जना मोर्चावर भाजप नेते तथा मंत्री आशिष शेलार यांनी रविवारी (दि.४) सडकून टीका केली. "मतदार यादी शुद्ध करा, बोगस मतदार काढा ही मागणी स्वतः राज ठाकरे आणि विरोधकांचीच होती, मग आता निवडणूक आयोग काम करीत असताना त्याला विरोध कशासाठी?" असा थेट सवाल विचारत ना. शेलार यांनी राज आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला.

भाजप नेते आशिष शेलार यांनी राज ठाकरे यांच्या जुन्या भाषणांची आठवण करून देत दुटप्पी भूमिकेवर बोट ठेवले. १५ ऑक्टोबर २०२५ रोजी राज यांनी स्वतः भाषणामध्ये राज्यात ९६ लाख मतदार बोगस असल्याचा दावा केला होता.



त्यानंतरही मुंबईत १० लाख दुबार आणि बोगस मतदार असल्याचा आरोप करीत ठाकरे यांनीच मतदार यादी शुद्ध करण्याची मागणी लावून धरली होती. उद्धव ठाकरे गट आणि इतर विरोधी पक्षांनीही संशयित आणि दुबार नावे वगळण्यासाठी मोर्चे काढले होते. मग आता जेव्हा निवडणूक आयोग एसआयआर प्रक्रियेद्वारे हीच बोगस व दुबार नावे वगळून यादी शुद्ध करण्याचे काम करीत आहे, तेव्हा नेमका विरोध कशासाठी चालवला आहे? अशी विचारणा शेलार यांनी केली.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर विरोधकांनी केलेल्या आरोपांनाही भाजप नेते शेलार यांनी उत्तर दिले. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक ही ज्ञानेश कुमार यांनी पदभार स्वीकारण्यापूर्वीच पार पडली होती. त्यामुळे त्यांच्यामुळे भाजप जिंकला हा आरोप पूर्णपणे बिनबुडाचा आणि हास्यास्पद आहे. जेव्हा विरोधक जिंकतात तेव्हा निवडणूक योग्य आणि भाजप जिंकला की फेरनिवडणुकीची मागणी हा कसला दुटप्पीपणा? असा सवालही शेलार यांनी यावेळी उपस्थित केला.

#### ईव्हीएम तर काँग्रेसने आणले!

ठाकरेंच्या मोर्चामधून बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्याच्या आणि ईव्हीएम हटवण्याच्या केलेल्या मागणीचा मंत्री शेलार यांनी समाचार घेतला. ईव्हीएम भाजपने आणलेले नाही याची आठवण करून देताना शेलार यांनी स्पष्ट केले की, १९८२मध्ये इंदिरा गांधींच्या काळात केरळ निवडणुकीत प्रथम ईव्हीएमचा प्रायोगिक वापर झाला. १९८९मध्ये राजीव गांधी पंतप्रधान असताना लोकप्रतिनिधी कायद्यात दुरुस्ती करून ईव्हीएमला अधिकृत मान्यता देण्यात आली. "आम्हाला जिंकता आले नाही की खेळपट्टी बदला, मैदान बदला ही लबाडांची मागणी आहे. पराभव पचवता येत नसल्यानेच हा विरोध सुरू आहे," असा टोलाही त्यांनी लगावला.



## पनवेलमध्ये रक्तदान आणि आरोग्य तपासणी शिबिरास प्रतिसाद

### स्व. मुग्धा लोंढे यांच्या पुण्यस्मरणानिमित्त उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या दिवंगत नगरसेविका मुग्धा लोंढे यांच्या सातव्या पुण्यस्मरणानिमित्त रविवारी (दि.४) पनवेल येथील विरूपाक्ष मंगल कार्यालयात रक्तदान आणि मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. स्व. सौ. मुग्धा लोंढे सेवा प्रतिष्ठानच्या वतीने आणि युवानाद ढोलताशा पथक, कच्छ युवक संघ, कन्या आरोग्य मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या सेवाभावी उपक्रमास नागरिकांचा प्रतिसाद लाभला.



या शिबिराला आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील, माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते जयंत पगडे, नगरसेवक राजू सोनी, नगरसेविका रूचिता लोंढे, सारिका भगत, युवा नेते मयुरेश नेतकर, अमित ओझे, वर्षा ठाकूर, अर्चना ठाकूर, स्वाती कोळी आदींनी भेट देऊन आयोजकांचे कौतुक केले.

यावेळी मान्यवरांनी स्व. मुग्धा लोंढे यांच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करीत त्यांच्या सामाजिक योगदानाला अभिवादन केले. समाजहितासाठी राबविण्यात येणारे असे उपक्रम हीच त्यांना खरी श्रद्धांजली असल्याची भावना आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केली.

स्व. मुग्धा लोंढे या प्रेमळ स्वभाव, जनसामान्यांशी असलेला दांडगा संपर्क आणि समाजसेवेची तळमळ यामुळे पनवेल परिसरात लोकप्रिय होत्या. त्यांच्या स्मृती जपण्यासाठी यावेळी अनेक नागरिकांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेतला, तर युवकांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व नागरिकांचे, वैद्यकीय पथकाचे आणि स्वयंसेवकांचे लोंढे, ओझे व समेळ कुटुंबीयांनी आभार मानले.

## विधान परिषद निवडणूक : भाजपचे उमेदवार जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या केंद्रीय निवडणूक समितीने महाराष्ट्रात होणाऱ्या विधान परिषद निवडणुकीसाठी आपल्या उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत. महायुतीतील जागावाटपानुसार पुणे पदवीधर, नागपूर पदवीधर आणि पुणे शिक्षक मतदारसंघासाठी भाजपने आपले उमेदवार निश्चित केले आहेत.

नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघातून भाजपकडून निष्ठावंत नेते सुधाकर कोहळे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे.



सुधाकर कोहळे | स्मिता जाधव | कौस्तुभ गावडे

त्यांना राजकीय प्रवासासोबतच शैक्षणिक क्षेत्राचा प्रदीर्घ अनुभव आहे.

पुणे पदवीधर मतदारसंघातून भाजपने डॉ. स्मिता योगेश जाधव यांच्या रूपाने नवा चेहरा निवडणुकीच्या रिंगणात उतरवला आहे. उच्चशिक्षित डॉ. जाधव या पिंपरी-चिंचवड येथील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू आहेत.

याशिवाय पुणे शिक्षक मतदारसंघातून कौस्तुभ मुरलीधर गावडे यांना उमेदवारी मिळाली आहे. कोल्हापूर येथील प्रसिद्ध श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून ते कार्यरत आहेत. विधान परिषद निवडणुकीसाठी २३ ऑक्टोबर रोजी मतदान होणार असून २७ ऑक्टोबरला मतमोजणी करून निकाल जाहीर केला जाणार आहे.

## टकमक टोकावरून तरुणाची आत्महत्या

**महाड : प्रतिनिधी**

किल्ले रायगडावरील टकमक टोकावरून एक ३७ वर्षीय तरुण शनिवारी सकाळपासून बेपत्ता होता. स्थानिक पोलिसांनी शोधमोहीम राबविल्यानंतर रविवारी (दि.४) सकाळी या तरुणाचा मृतदेह आढळून आला.

सुयोग सुरेश पांचाळ (३७, रा. बीजघर, खेड, रत्नागिरी; सध्या रा. रामनगर, वागळे इस्टेट, ठाणे) असे मयत तरुणाचे नाव असून तो शनिवारी पहाटे किल्ले रायगडाच्या पायथ्याशी आपली कार पार्क करून पायरी मार्गाने किल्ल्यावर गेला होता.

(सविस्तर वृत्त पान २ वर..)

## निवडक

### राज्यसभेसाठी भाजप उमेदवारांची घोषणा

**नवी दिल्ली :** भाजपच्या केंद्रीय निवडणूक समितीने राज्यसभा निवडणुकीसाठी उत्तराखंडमधून दिनेश आर्य आणि पश्चिम बंगालमधून रुक्मिणी मल्लिक यांना उमेदवारी दिली आहे. राज्यसभेच्या एकूण १२ जागांसाठी १६ ऑक्टोबरला मतदान व मतमोजणी आहे.

### रेस्ट ऑफ इंडियाचा इराणी कपवर कब्जा

**श्रीनगर :** इराणी कप स्पर्धेच्या अंतिम सामन्यात रेस्ट ऑफ इंडियाने जम्मू-काश्मीरचा १६७ धावांनी पराभव करत विजेतेपदावर नाव कोरले. रणजी चषक विजेत्या जम्मू-काश्मीरसमोर विजयासाठी २७९ धावांचे लक्ष्य होते, मात्र त्यांचा दुसरा डाव अवघ्या १११ धावांवर आटोपला. रेस्ट ऑफ इंडियाचा गोलंदाज मुकेश कुमारने दुसऱ्या डावात सहा बळी टिपून संघाच्या विजयात निर्णायक भूमिका बजावली.

## रायगडच्या रोशनी पारधीची महाराष्ट्र क्रिकेट संघात निवड

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगडची अष्टपैलू खेळाडू रोशनी रवींद्र पारधी हिची महाराष्ट्राच्या १९ वर्षांखालील मुलींच्या टी-२० क्रिकेट संघात निवड करण्यात आली आहे. यापूर्वी रोशनीची महाराष्ट्राच्या विविध वयोगटांतील मुलींच्या क्रिकेट संघात आणि महिलांच्या वरिष्ठ गटातदेखील निवड झाली होती.



रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए) आणि महाडच्या एसबीसी क्रिकेट अकॅडमीची अष्टपैलू खेळाडू असणारी रोशनी जलदगती गोलंदाज व धडाकेबाज फलंदाज असून तिने सातत्याने उत्तम खेळाचे प्रदर्शन केले आहे. एसबीसी अकॅडमीचे मुख्य प्रशिक्षक आवेश चिचकर, अध्यक्ष बशीर चिचकर हे रोशनीसाठी परिश्रम घेत आहेत.

रोशनीने सातत्याने क्रिकेट खेळासाठी घेतलेल्या मेहनतीचे चीज झाले. भविष्यात तिची निवड महाराष्ट्राच्या मुलींच्या मुख्य संघात आणि त्यानंतर भारतासाठीही व्हावी हीच आपली इच्छा असल्याचे रोशनीचे वडील रवींद्र पारधी यांनी सांगितले.

दरम्यान, आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांनी रोशनी, तिचे पालक आणि प्रशिक्षकांचे कौतुक व अभिनंदन केले. रोशनीला भविष्यात लागेल ती मदत केली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

## म्यूल अकाऊंटप्रकरणी सहा जणांना अटक

**अलिबाग : प्रतिनिधी**

दुसऱ्यांच्या नावाने बँक खाते उघडून (म्यूल अकाऊंट) अफरातफरीसाठी आणि फसवणुकीसाठी त्यांचा वापर करणाऱ्या सहा आरोपींना रायगड पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून लाखोंचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

मयूर विलास म्हात्रे (२५, रा. उंबर्डे फाटा, पेण), पवन कुमार चिलीमुंटा (२३, रा. काकीनाडा, आंध्र प्रदेश), अभिषेक गुप्ता (१९), अमनकुमार गुप्ता (२२), विधिसंघर्षित बालक (वय १६, तिघेही रा. बांदा, उत्तर प्रदेश), वंश जितेंद्रकुमार सिंह (२१, कानपूर, उत्तर प्रदेश) अशी अटकेत असलेल्या आरोपींची नावे आहेत. रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल व अपर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर गुन्हे शाखेच्या पथकाने ही कारवाई केली.

#### लाखोंचा मुद्देमाल जप्त

आरोपींकडून रोख रक्कम ५७ हजार रुपये, फसवणुकीच्या व्यवहारांशी संबंधित ७२ एटीएम कार्ड, वॉलेट ऑपरेट करण्याचे एक डोंगल, सात रोमिंग कार्ड, चारचाकी वाहन, ५२ सीमकार्ड, १८ मोबाइल फोन, तीन लॅपटॉप, एक पेन ड्राईव्ह, पाच प्रिपेड कार्ड, सहा मेमरी कार्ड असा लाखोंचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सायबर गुन्हेगारीच्या संघटित टोळ्यांच्या माध्यमातून गुंतवणूक योजना, अर्धवेळ नोकरीची संधी, डिजिटल अटक, शेअर मार्केट अशा आमिषांद्वारे नागरिकांची ऑनलाइन फसवणूक करतात. फसवणुकीची रक्कम वेगवेगळ्या बँक खात्यांत जमा करून घेतली जाते. यासाठी गरजू व्यक्तींच्या नावाने बँकेत सेव्हिंग किंवा करंट खाती उघडून त्यांचे पासबुक, एटीएम, चेकबुक व सीमकार्ड स्वतःकडे ठेवले जाते आणि या म्यूल खात्यांचा वापर सायबर फसवणुकीसाठी केला जातो.

पैशांच्या प्रलोभनाला बळी पडून कोणत्याही व्यक्तीने आपले बँक खाते, वैयक्तिक कागदपत्रे, फोटो, सीमकार्ड इत्यादी माहिती दुसऱ्या/अनोळखी व्यक्तीस वापरण्यास, चालवण्यास देऊ नये. रायगड पोलिसांनी म्यूल अकाऊंट्सचा शोध घेऊन त्यावर कारवाई करण्याची मोहीम हाती घेतली आहे. पोलीस यंत्रणेला सायबर फसवणूक झाल्याचे समजले व त्यामध्ये एखाद्याचे कागदपत्र, बँक खाते, फोटो, सीमकार्ड वापरल्याचे निष्पन्न झाल्यास अशा व्यक्तीला पोलिसांच्या कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशारा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी दिला आहे.

## माथेरानमध्ये रानफुलांची रंगत

### पर्यटकांची पावले निसर्गरम्य पर्यटनस्थळाकडे



**माथेरान : प्रतिनिधी**

पावसाळ्यानंतर माथेरानच्या डोंगररांगांवर विविध रानफुलांची रंगत पाहायला मिळत आहे. त्यात सोनकीच्या पिवळ्या फुलांनी डोंगर आणि पठारांना जणू सोनेरी साज चढवला आहे. निसर्गाचा हा बदलता रंग पाहण्यासाठी माथेरानमध्ये मोठ्या प्रमाणावर पर्यटक येत आहेत.

सण-उत्सवांची लगबग संपल्यानंतर आता प्रसिद्ध पर्यटनस्थळ माथेरानकडे पुन्हा पर्यटकांचा ओघ वाढू लागला आहे. ऊन-पावसाचा लपंडाव, धुक्याने वेढलेले डोंगर, वाहणारे छोटे धबधबे आणि सर्वत्र पसरलेली हिरवाई यामुळे माथेरानचे निसर्गसौंदर्य खुलले आहे. ऑक्टोबरनंतर हवामान तुलनेने आल्हाददायक असल्याने भटकंती, पॉइंट्स पाहणे आणि निसर्ग अनुभवण्यासाठी हा काळ पर्यटकांसाठी महत्त्वाचा ठरतो.

निसर्गसौंदर्याची पर्वणी लाभलेल्या माथेरानमधील एको पॉइंट, पॅनोरमा पॉइंट, वन ट्री हिल, शारलोट लेक यांसह विविध प्रेक्षणीय स्थळांकडे पर्यटकांची पावले वळत आहेत. सुट्टीच्या दिवसांमध्ये पर्यटकांची संख्या वाढत असल्याने पर्यटनावर अवलंबून असलेल्या स्थानिक व्यावसायिकांमध्येही उत्साहाचे वातावरण आहे.

माथेरानच्या पर्यटनाचा अविभाज्य भाग असलेली नेरळ-माथेरान मिनीट्रेन पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र राहिली आहे. पावसाळ्यात दरडी कोसळण्याचा धोका असल्याने ही ट्रेन बंद ठेवली जाते. पावसाळा सरल्याने आता या मिनीट्रेनची उत्सुकता पर्यटकांना लागली आहे. दसऱ्याच्या मुहूर्तावर माथेरानची राणी डोंगरदऱ्यांमधून पुन्हा धावणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे
चांगू काना ठाकूर
आर्टस्, कॉमर्स अँन्ड सायन्स कॉलेज, न्यु पनवेल (अधिकारप्रदत्त स्वायत्त)
नॅक द्वारा मानांकित A++ श्रेणी, (4th Cycle CGPA 3.52) विद्यापीठ अनुदान आयोगाचा 'श्रेष्ठत्व सक्षम महाविद्यालय दर्जा', मुंबई विद्यापीठाचे 'सर्वोत्कृष्ट महाविद्यालय' पारितोषिक
|| विद्या विनयेन शोभते ||

पोलीस भरती पूर्व प्रशिक्षणासाठी का निवडायचे चांगू काना ठाकूर महाविद्यालय
शिक्षणासह पोलीस भरतीची तयारी करणारे एकमेव महाविद्यालय
सर्व सुविधा एकाच छताखाली
तज्ज्ञ प्राध्यापक वृंद
शारीरिक चाचणीकरिता सुसज्ज मैदान
लेखी परीक्षेकरिता समृद्ध वाचनालय

डॉ. सी. डी. देशमुख स्पर्धा परीक्षा केंद्र अंतर्गत
पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण अकॅडमी
महाराष्ट्र पोलीस भरती 2026 | खाकी वर्दीचे स्वप्न करा साकार...
ही संधी पुन्हा नाही ! | प्रमुख वैशिष्ट्ये | कालावधी :- ४ महिने
• मैदानी चाचणी (Ground Training): तज्ज्ञ प्रशिक्षकांद्वारे रोज संध्याकाळी विशेष सराव.
• लेखी परीक्षा तयारी: गणित, बुद्धिमत्ता, मराठी व्याकरण व सामान्य ज्ञान (GK) चे वर्ग.
• सराव परीक्षा: नवीन परीक्षा पद्धतीवर आधारित नियमित टेस्ट सिरीज.
• अनुभवी मार्गदर्शक: आजी-माजी पोलीस अधिकारी व नामांकित प्राध्यापकांचे मार्गदर्शन.
• अभ्यासिका व नोट्स: ग्रंथालय सुविधा आणि विषयानुरूप अद्ययावत स्टडी मटेरियल.



प्रवेश मर्यादित... आजच आपली जागा निश्चित करा. | बॅच सुरु: ०५/१०/२०२६ | नोंदणी सुरु | स्पेशल बॅच
शारीरिक चाचणी पूर्व तयारी - संध्याकाळी ५ ते ७ | लेखी परीक्षा विशेष वर्ग - संध्याकाळी ३ ते ५
समन्वयक : डॉ. दत्तात्रय म. तोंडे । संपर्क :- ८९९९३३१६०२
पत्ता: स्पर्धा परीक्षा कक्ष,रूम न १२, चांगू काना ठाकूर महाविद्यालय परिसर, प्लॉट नं. १, सेक्टर ११, नवीन पनवेल, रायगड - ४१०२०६.

# देशाचा पंतप्रधान घुसखोरांनी ठरवायचा का?

## एसआयआरवरून भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाणांचा ठाकरे बंधूंना सवाल

**मुंबई : प्रतिनिधी**

एसआयआरविरोधात ठाकरे बंधूंनी काढलेल्या गर्जना मोर्चावर भारतीय जनता पक्षाने आक्रमक भूमिका घेतली आहे. भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेत मांडलेल्या भूमिकेचा दाखला देत ठाकरे बंधूंसह विरोधकांवर निशाणा साधला. "एसआयआर प्रक्रियेला विरोध करणाऱ्यांनी आधी घुसखोर आणि बोगस मतदानावर आपली भूमिका स्पष्ट करावी," असे थेट



आव्हान चव्हाण यांनी दिले.

भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली असून, त्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेत 'एसआयआर' प्रक्रियेच्या समर्थनार्थ केलेल्या भाषणाचा व्हिडिओ जोडला आहे. गृहमंत्र्यांचे संसदेतील मुद्दे अधोरेखित करत चव्हाण यांनी मोर्चा काढणाऱ्या राजकीय नेत्यांना आणि विरोधी पक्षांना तीन सवाल विचारले आहेत.

पंतप्रधान-मुख्यमंत्री घुसखोरांनी ठरवायचे का?: "देशाचे पंतप्रधान आणि राज्याचे मुख्यमंत्री कोण असावे, हे काय आता घुसखोरांनी ठरवायचे का? आणि तसे झाले, तर या देशातील लोकशाही सुरक्षित राहील का?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला."एका मतदाराला एकापेक्षा अधिक ठिकाणी मतदान करण्याची मुभा असावी का? बोगस मतदानाला विरोधकांचे समर्थन आहे का?" असा रोखठोक प्रश्न त्यांनी विचारला.

मृत व्यक्तींना मतदार यादीत स्थान का हवे?: "ज्या नागरिकांचा मृत्यू झाला आहे, त्यांची नावे आजही मतदार यादीत असावीत का?" असा सवाल करत मतदार याद्यांच्या पारदर्शकतेवर बोट ठेवले.

भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण पुढे म्हणाले की, मतदार यादीतील त्रुटी दूर करणे, मृत व्यक्तींची आणि स्थलांतरित झालेली दुबार नावे वगळणे तसेच घुसखोरांना मतदानाचा अधिकार न देणे ही लोकशाही बळकट करणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे कोणत्याही राजकीय हेतूने प्रेरित होऊन 'एसआयआर' प्रक्रियेला विरोध करणाऱ्या विरोधकांनी आधी आमच्या या तीन प्रश्नांची उत्तरे जनतेला द्यावीत आणि नंतरच रस्त्यावर उतरून विरोध करावा, असा टोला त्यांनी लगावला.

## मुंबई-मडगाव आणि मुंबई-नागपूर आठ साप्ताहिक विशेष रेल्वेगाड्या

**रोहा : प्रतिनिधी**

सुट्टीच्या काळात प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी मध्य रेल्वे मुंबई मडगांव आणि मुंबई नागपूर दरम्यान ८ विशेष गाड्या चालवणार आहे.

यामध्ये लोकमान्य टिळक टर्मिनस मडगांव लोकमान्य टिळक टर्मिनस साप्ताहिक विशेष गाड्या (४ सेवा).गाडी क्रमांक ०१०२९ ही साप्ताहिक विशेष गाडी २ अक्टो. (शुक्रवार) आणि ४ अक्टो. (रविवार) रोजी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून ००.२५ वाजता सुटेल आणि मडगांव येथे त्याच दिवशी १५.१५ वाजता पोहोचेल (२ सेवा).गाडी क्रमांक ०१०३० ही साप्ताहिक विशेष गाडी २ अक्टो.(शुक्रवार) आणि ४ अक्टों. (रविवार) रोजी मडगांव येथून १६.०० वाजता सुटेल आणि लोकमान्य टिळक टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी ३.४५ वाजता पोहोचेल (२ सेवा). या गाडीला ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, वीर, खेड, चिपळूण, सावर्डा, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, अडावली, राजापूर रोड, वैभववाडी रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी रोड, थिवि आणि करमळी हे थांबे देण्यात आले आहेत. विशेष गाडी क्रमांक ०१०२९, गाडी क्रमांक ०२१४१ आणि गाडी क्रमांक ०२१४२ साठी आरक्षण १ अक्टो. रोजी सुरू होईल.

## पेट्रोलियम व नैसर्गिक वायूविषयक स्थायी समितीच्या अध्यक्षपदी तटकरेंची फेरनियुक्ती

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगडचे खासदार सुनील तटकरे यांची संसदेच्या पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायूविषयक स्थायी समितीच्या अध्यक्षपदी फेरनियुक्ती करण्यात आली आहे. २०२६-२७ साठी पुनर्रचित संसदीय समित्यांमध्ये तटकरे यांच्याकडे ही जबाबदारी कायम ठेवण्यात आली आहे. संसदेच्या अधिकृत संकेतस्थळावरही त्यांचे नाव या समितीचे अध्यक्ष म्हणून नमूद आहे.

ही फेरनियुक्ती केवळ एका लोकप्रतिनिधीला मिळालेली जबाबदारी नसून, रायगड आणि रत्नागिरीसारख्या ग्रामीण व किनारी जिल्ह्यांच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जात आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू क्षेत्राशी संबंधित विषय, मंत्रालयाच्या अनुदानाच्या मागण्या, धोरणात्मक बाबी आणि शासनाच्या कार्यवाहीचा संसदीय पातळीवर आढावा घेण्याचे काम या स्थायी समितीमार्फत केले जाते. समितीत लोकसभा व राज्यसभेतील एकूण ३१ सदस्य असतात.

रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांतील अनेक शैक्षणिक संस्थांना विविध माध्यमांतून अर्थसहाय्य मिळवून देण्यासाठी तटकरे यांनी पाठपुरावा केल्याचा दावा त्यांच्या समर्थकांकडून करण्यात येत आहे. या माध्यमातून शाळा, महाविद्यालये आणि अन्य शैक्षणिक संस्थांच्या पायाभूत सुविधांना चालना मिळाली असून, विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्यास मदत झाल्याचे सांगितले जाते.



कंपन्यांच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून (CSR) समाजोपयोगी आणि सर्वसमावेशक उपक्रमांना चालना देण्याची मोठी क्षमता आहे. शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा, सामाजिक कल्याण आणि सार्वजनिक उपयोगाच्या सुविधांसाठी अशा निधीचा उपयोग झाल्यास शासनाच्या प्रयत्नांना पूरक अशी विकासाची प्रक्रिया उभी राहू शकते.याच पार्श्वभूमीवर तटकरे यांच्या फेरनियुक्तीकडे रायगड आणि रत्नागिरीतील विविध क्षेत्रांचे लक्ष लागले आहे.

खासदार सुनील तटकरे यांची पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायूविषयक स्थायी समितीच्या अध्यक्षपदी फेरनियुक्ती झाल्याबद्दल रायगड, रत्नागिरीसह विविध स्तरांतून अभिनंदन होत असून, नव्या जबाबदारीच्या माध्यमातून जिल्ह्याच्या शैक्षणिक, सामाजिक आणि विकासाच्या वाटचालीला आणखी बळ मिळावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## टकमक टोकावरून उडी मारून तरुणाची आत्महत्या

**महाड : प्रतिनिधी**

किल्ले रायगडावरील टकमक टोका वरून खेड येथील ३७ वर्षीय तरुणाने उडी मारून शनिवारी सकाळी आत्महत्या केली होती. पोलिस प्रशासनाने शनिवारी सायंकाळपासून रेस्क्यु टिमच्या मदतीने शोध मोहीम सुरू केली होती परंतु रात्र झाल्याने थांबवलेली ही शोध मोहीम रविवारी सकाळी पुन्हा सुरु करण्यात आली. ड्रोन कॅमेऱ्याच्या सहाय्याने मृतदेहाचा शर्ट खोल दरीत डिटेक्ट झाल्यानंतर अथक परिश्रमानंतर रेस्क्यु टिमचे जवान आपदा मित्र व पोलिसांनी मृतदेह बाहेर काढला.

याबाबत महाड तालुका पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की सुयोग सुरेश पांचाळ (वय ३७, रा. बीजघर, खेड, रत्नागिरी) हे ३ ऑक्टोबर रोजी पहाटे किल्ले रायगडाच्या पायथ्याशी आपल्या आर्टिगा कार क्रमांक पायथ्याशी पार्क करून ते पायरी मार्गाने किल्ल्यावर गेले. सकाळी साडेसातच्या सुमारास ते टकमक टोक परिसरात पोहोचले. त्यानंतर त्यांनी पत्नीला व्हॉट्सअॅपवर संदेश पाठवून जीवन संपविण्याबाबत सूचक संदेश पाठविल्याची माहिती नातेवाईकांकडून मिळाली. त्यानंतर त्यांचा मोबाईल बंद झाला. या प्रकाराची माहिती मिळताच त्यांच्या भावाने किल्ले रायगड परिसरात शोध घेण्यास सुरुवात केली. तसेच पोलिसांना माहिती देण्यात आल्यानंतर पोलिस पथकानेही रेस्क्यु टिम व आपदा मित्रांच्या मदतीने शनिवारी दुपार नंतर गड परिसरात शोधमोहीम हाती घेतली. पायथ्याशी संबंधित व्यक्तीचे वाहन आढळून आले.

शनिवारी रात्र झाल्याने रविवारी सकाळपासून शोधमोहीम अधिक व्यापक करण्यात आली. ड्रोनच्या सहाय्याने परिसराची पाहणी केली असता संशयित ठिकाणी मृतदेह आढळल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. मृतदेह बाहेर काढण्यासाठी रेस्क्यू टीमकडून प्रयत्न सुरू करण्यात आले. या शोधमोहिमेत रेस्क्यू टीम कोलाडचे सागर दहीआंबेकर, एडवेंचर सोल महाडचे विशाल खांबे, शिलेदार एडवेंचर सोल कोल्हापूरचे सागर नलावडे तसेच आपदा मित्र महाडचे टीम लीडर अमिताभ जाधव यांच्यासह रेस्क्यू सदस्य सहभागी झाले आहेत. घटनास्थळी तालुका पोलीस निरीक्षक अभिजीत नेवसे हे घटनास्थळी उपस्थित राहून मार्गदर्शन करीत होते. पोलिस प्रशासन आणि रेस्क्यू पथकाकडून अत्यंत कठीण भौगोलिक परिस्थितीत शोध व बचावकार्य करीत अखेर मृतदेह बाहेर काढून शव विच्छेदनासाठी महाड येथे शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आहे.



## नेरळचा पेशवाई रस्ता बनला काँक्रीटचा! पर्यायी मार्गामुळे वाहतूक कोंडी होणार कमी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील नेरळ गावाला पेशवाई रस्ता रखडला होता तो आता काँक्रीटचा बनला आहे. खड्डेमय रस्ता म्हणून या रस्त्याचा वापर बंद झाला होता मात्र आमदार महेंद्र थोरवे यांनी एम एम आय डी सी च्या माध्यमातून या रस्त्यासाठी १७ कोटींचा निधी मंजूर करून आणला. या निधीमधून काँक्रीटचा रस्ता तयार झाला असून खड्डेमय रस्ता अशी ओळख पुसली गेली असून पर्यायी रस्ता म्हणून वाहनचालक यांच्याकडून या रस्त्याचा वापर होऊ लागला आहे. या रस्त्यामुळे वाहतूक कोंडी कमी होणार आहे.



कर्जत तालुक्यातील अनेक वर्षांपासून रखडलेला आणि अतिशय दयनीय अवस्थेत असलेला नेरळ येथील 'पेशवाई मार्ग' अखेर कात टाकत आहे. तब्बल दोन दशके रस्त्यावरील खड्ड्यांमुळे हा रस्ता माणसाला पायी चालणेही अशक्य झाले होते. त्यामुळे या मार्गाचा वापर कोणीही करत नव्हता आज अवजड वाहनांकडून रस्त्याचा वापर होत असल्याने दोन ते चार फुटाचे खड्डे या रस्त्यावर तयार झाले होते. त्यामुळे या रस्त्याने जाणाऱ्या वाहन चालकांना मोठी कसरत करावी लागत होती.

नेरळ गावातील रेल्वे फाटक येथे होणारी दररोजची वाहतूक कोंडी यामुळे वाहन चालकांची गैरसोय टाळण्यासाठी आमदार महेंद्र थोरवे यांनी या समस्येकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले. या रस्त्यावर काँक्रिटच्या दोन लेन आणि सोबत रस्त्याच्या दुतर्फा संरक्षक भिंती अशी रचना करून कायमस्वरूपी भक्कम रस्ता तयार करण्याचा त्यांचा प्रयत्न राहिला आहे.

नेरळ बाजारपेठेतील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी दामत रेल्वे गेट ते आंबिवली रेल्वे गेट या पेशवाई मार्गाचे काँक्रिटीकरण अत्यंत गरजेचे होते. सध्या या रस्त्याचे काँक्रिटीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. या नव्या मार्गामुळे आता कळंब-कशेळे, बदलापूर तसेच मुरबाडच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांना ट्रॅफिकमध्ये अडकून पडणार नाहीत.

## अनधिकृत बांधकामाविरोधात ऐरोली विभाग कार्यालयाची कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका कार्यक्षेत्रात अनधिकृत बांधकाम विरोधी मोहीमा सर्वच विभाग कार्यालयांमार्फत तीव्रतेने राबविण्यात येत आहेत. यामध्ये नोटीस देऊनही नोटीशीची दखल न घेणा-या अनधिकृत बांधकामांवर जी विभाग ऐरोली कार्यालयाच्या वतीने धडकपणे तोडक कारवाया सलग ३ दिवस करण्यात आल्या.

यामध्ये काशिनाथ यादव, एस. आर. वर्मा-विकासक काशिनाथ मतभिक यादव यांनी घर क्र- H-१०६, से-४, ऐरोली आणि घर क्र- H-१०७, से-४, ऐरोली,नवी मुंबई येथे अनधिकृतपणे बांधकाम सुरु केले होते.या दोन्ही अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आली. ३० सप्टेंबर रोजी करण्यात आली. सोमनाथ तुकाराम सोनावळे, मिनल



बागवे, शिवशंकर अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन- भोगवटाधारक, अनिल कुमार गुप्ता, सुलतान-ठेकेदार, सुमित्रा सुर्यकांत पोळ, इसरार शेख-ठेकेदार यांच्या एम-६८, से-०४, ऐरोली; एएल-१-५१४, शिवशंकर ओ.अ, से-१६, ऐरोली; प्लॉट नं-८१, से-२बी, ऐरोली आणि जी-११५, से-०४, ऐरोली येथे अनधिकृतपणे सुरू असलेल्या बांधकामांवर करण्यात आली.

सलग तिस-या दिवशी म्हणजे १ ऑक्टोबर रोजी जी विभाग ऐरोली कार्यालयांतर्गत प्रशांत सदाशिव यादव, शिवाजी आनंदराव जाधव, अमित लोखंडे, जितेंद्र कुमार, सुमन सेन यांनी क्यू - १३०, से-०४, ऐरोली; पी-१६३, से-०४, ऐरोली; एस-१४२, से-०४, ऐरोली आणि सी -३२६, से-०२, ऐरोली, नवी मुंबई येथे सुरू केलेल्या अनधिकृत बांधकामावर तोडक कारवाई करण्यात आली.या चारही ठिकाणी सी.सी व्यतिरिक्त अनधिकृत वाढीव बांधकामे सुरू होती.

## रुग्ण समिती सदस्याच्या वाढदिवसानिमित्त फळवाटप

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत उपजिल्हा रुग्णालयातील रुग्ण कल्याण सण समितीचे सदस्य सोमनाथ बबन पालकर यांच्या वाढदिवसा निमित्त रुग्णालयातील रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले.

पालकर यांच्या वाढदिवसा निमित्त पंचायत समिती सभापती नमिता घारे, नगराध्यक्ष पुष्पा दगडे, उपनगराध्यक्ष संतोष पाटील, नगरसेवक अशोक राऊत, राजाभाऊ कोठारी, महेंद्र चंदन, अंजली कडू, मानसी कानिटकर, माजी उपनगराध्यक्ष उमेश गायकवाड, माजी नगरसेवक गुरुनाथ पालकर, मधुरा चंदन, भारती पालकर, राष्ट्रवादी महिला तालुकाध्यक्ष ॲड. रंजना धुळे यांच्या उपस्थितीत रुग्णालयातील रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी वैद्यकीय अधिक्षक डॉ. दीपक अडकमोल यांनी उपस्थितांचे स्वागत केले. राजाभाऊ कोठारी यांनी सोमनाथ पालकर यांच्या समाजकार्याची माहिती सांगितली. याप्रसंगी भानुदास पालकर, केतन बेलोसे, कृष्णा जाधव, राकेश परमार , अतुल कडू, सुयोग मांडे आदी उपस्थित होते.



## माथाडी कामगारांची मंत्र्यांबरोबर उद्या निर्णायक बैठक



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

कांदा-बटाटा बाजारातील ५० किलो वजन मर्यादेवरून माथाडी कामगार आणि व्यापाऱ्यांमध्ये निर्माण झालेल्या संघर्षावर शुक्रवारी तात्पुरता तोडगा निघाला. मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या (एपीएमसी) दालनात झालेल्या संयुक्त बैठकीत सध्या बाजारात असलेल्या शेतमालाच्या ५२ किलोपर्यंतच्या गोण्यांचे चढ-उताराचे काम सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे गुरुवारी बंद असलेले काम पुन्हा सुरू झाले असून बाजारातील व्यवहार सुरळीत झाल्याचा दावा कांदा-बटाटा आडत व्यापारी संघटनेने केला आहे. मात्र, वजनमर्यादेबाबत अंतिम निर्णय मंगळवारी पणनमंत्री जयकुमार रावल यांच्याबरोबरच्या बैठकीत होणार आहे.

. ५० किलोपेक्षा अधिक वजनाच्या गोण्या उचलण्याच्या मुद्द्यावरून गुरुवारी कांदा-बटाटा बाजारातील व्यवहारावर परिणाम झाला होता. शुक्रवारी व्यापाऱ्यांनी बाजार बंद ठेवला, तर माथाडी कामगारांनी ५० किलो वजनमर्यादेचीच अंमलबजावणी करण्याची भूमिका घेतली. या प्रश्नावरून माथाडी कामगारांनी रस्त्यावर उतरुन आंदोलन केल्याने बाजार परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

शासनाच्या आदेशानुसार ५० किलो वजनाच्या गोण्या बाजारात आणण्याची मागणी माथाडी कामगारांकडून केली जात आहे. नाशवंत माल असल्याने वजनामध्ये काही प्रमाणात वाढ होण्याची शक्यता व्यापाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. मात्र, वजनमर्यादेच्या अंमलबजावणीच्या मुद्द्यावरून दोन्ही बाजूंमध्ये मतभेद निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर बाजार समितीच्या दालनात माथाडी कामगार आणि व्यापारी प्रतिनिधींची संयुक्त बैठक घेण्यात आली.बैठकीनंतर सध्या बाजारात आलेल्या शेतमालाचे चढ-उताराचे काम ५२ किलोपर्यंत सुरू करण्याचे ठरले. माथाडी कामगारांनीही ५२ किलोपर्यंतच्या गोण्या उतरविण्यास तयारी दर्शवली आहे. त्यामुळे बाजारातील बंद असलेले काम पुन्हा सुरू झाले.व्यापाऱ्यांनीही बाजारातील व्यवहार सुरू ठेवण्याची भूमिका घेतली आहे.दरम्यान, संयुक्त बैठकीनंतर कांदा-बटाटा आडत व्यापारी संघटनेने सभासद आडते आणि व्यापाऱ्यांना सूचना जारी केली आहे.

सध्या बाजारातील व्यवहार सुरळीत सुरू झाले असून ५० किलोपेक्षा अधिक वजनाचा माल मागवू नये, अशी सूचना संघटनेने केली आहे. जादा वजनाचा शेतमाल मागविल्यास संबंधित आडते अथवा व्यापारी जबाबदार राहतील, असेही संघटनेने स्पष्ट केले आहे. मंगळवारी अंतिम निर्णय

## दुखवटा

### लक्ष्मी जाधव

**माणगाव :** तालुक्यातील पाणसई गावचे रहिवासी ॲड.परेश जाधव यांच्या मातोश्री लक्ष्मी मारुती जाधव यांचे सोमवार दि.२८ सप्टेंबर रोजी रात्री ११ वाजता त्यांच्या राहते घरी` वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ९३ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात दोन मुले,सुना,नातवंडे असा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी बुधवार दि.७ ऑक्टोबर रोजी तर उत्तरकार्य विधी शुक्रवार दि.९ ऑक्टोबर रोजी राहते घरी पाणसई ता.माणगाव येथे होणार आहे.



### सुरेश ठाकूर

**उरण :** नगरसेवक अतुल ठाकूर यांचे वडील, नगरसेवक राजू ठाकूर यांचे काका तसेच उरणमधील सुप्रसिद्ध वॉटर सप्लायर सुरेश पांडुरंग ठाकूर यांचे बुधवार, दि. ३० सप्टेंबर रोजी निधन झाले.त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, भाऊ, पुतणे असा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी गुरुवार, दि. ८ ऑक्टोबर रोजी श्री क्षेत्र माणकेश्वर येथे होणार आहे. उत्तरकार्य शनिवार दि. १० ऑक्टोबर रोजी अयोध्या इमारत, पालवी हॉस्पिटलजवळ, उरण शहर येथे होणार आहे.



# पनवेल मनपाचा अतिक्रमणविरोधी बडगा

**कळंबोली, खारघर, कामोठे, नावडेत कारवाई**

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार पनवेल महापालिका क्षेत्रातील रस्ते आणि फुटपाथ मोकळे ठेवण्यासाठी पालिका प्रशासनाने अतिक्रमणविरोधी मोहीम अधिक तीव्र केली आहे. गेल्या चार दिवसांपासून प्रभाग समिती ‘ड’ पनवेलच्या माध्यमातून अतिक्रमण विभागाने शहरातील अनधिकृत हातगाड्या, अनधिकृत फळे-भाजी विक्री व्यवसायधारकांवर मोठी कारवाई केली.



१ ते ४ ऑक्टोबर या चार दिवसांत करण्यात आलेल्या कारवाईत एकूण दोन लाख सात हजार ५०० रुपये दंड वसूल करण्यात आला. तसेच पालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने कळंबोली, खारघर, कामोठे आणि प्रभाग उपविभाग नावडे या परिसरात विनापरवाना व अनधिकृतपणे थाटलेल्या दुकानांवर आणि फेरीवाल्यांवर धडक दंडात्मक कारवाई करण्यात आली. कळंबोली परिसरातील सेंट जोसेफ शाळेसमोर विद्यार्थ्यांची व पालकांची मोठी वर्दळ असते. फुटपाथवरील अतिक्रमणामुळे नागरिकांना रस्त्यावरून चालावे लागत होते. त्यामुळे फुटपाथवर अनधिकृतपणे थाटलेल्या स्टॉल्सवर पालिका कर्मचाऱ्यांनी थेट कारवाई केली. परिसरातील नर्सरी चालकांना प्रशासनाकडून अंतिम इशारा देण्यात आला असून त्यांनी विक्रीसाठी रस्त्यावर ठेवलेली झाडे तत्काळ हटवण्यात आली आहेत.

खारघर क्षेत्रातही अनधिकृतपणे चालणाऱ्या खाद्यपदार्थ विक्रेत्यांवर पालिका पथकाने कारवाईचा बडगा उगारला. रस्त्याच्या कडेला आणि दुकानांच्या बाहेरील मोकळ्या जागेत अनधिकृतपणे साहित्य ठेवून अतिक्रमण करणाऱ्या दुकानदारांचे सामान जप्त करण्यात आले. प्रभाग समिती ‘क’ कामोठे अंतर्गत ३ ऑक्टोबर रोजी विशेष मोहीम राबवून अतिक्रमण हटवण्यात आले. यामध्ये कामोठे परिसरात अतिक्रमण विभागाकडून करण्यात आलेल्या कारवाईत एकूण २८ हजार रुपये दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली. नावडे परिसरात अनधिकृत व्यवसाय करणाऱ्या हातगाड्या, अनधिकृत फळे व भाज्या विक्री व्यवसायधारकांवर दंडात्मक कारवाईच्या माध्यमातून शनिवारी १२ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला.

पनवेल, कामोठे आणि नावडे उपविभागांतून आतापर्यंत एकूण दोन लाख ४७ हजार रुपये दंड पालिकेच्या तिजोरीत जमा झाला आहे. पनवेल महापालिका क्षेत्रातील मुख्य रस्ते, शाळांचे परिसर आणि सार्वजनिक जागा अतिक्रमणमुक्त करण्यासाठी ही धडक मोहीम यापुढेही अशीच सुरू राहील, असा इशारा प्रशासनाच्या वतीने देण्यात आला आहे. नागरिक आणि स्थानिक व्यापाऱ्यांनी सार्वजनिक जागांवर अनधिकृतपणे सामान ठेवून वाहतुकीस अथवा पादचाऱ्यांना अडथळा निर्माण करू नये, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे यांनी पालिकेच्या वतीने केले आहे.

# पनवेलमध्ये दिव्यांग असेसमेंट कॅम्पला प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून आणि ॲलिम्कोच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विशेष एडीआयपी योजनेंतर्गत पनवेलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या दिव्यांग बांधवांच्या असेसमेंट कॅम्पला मोठा प्रतिसाद लाभला. चांगू काना ठाकूर महाविद्यालयात आयोजित शिबिरात शेकडो दिव्यांग नागरिकांनी सहभाग नोंदवला.

पनवेल येथील सीकेटी महाविद्यालयात रविवारी (दि. ४) आयोजित विशेष एडीआयपी असेसमेंट कॅम्पमध्ये दिव्यांग बांधवांची तपासणी आणि नोंदणी प्रक्रिया पार पडली. केंद्र सरकार आणि ॲलिम्को यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित उपक्रमाचा उद्देश दिव्यांग नागरिकांना आवश्यक सहाय्यक साधने उपलब्ध करून देणे हा आहे. या तपासणी शिबिराचे दुसऱ्यांदा आयोजन करण्यात आले होते. यापूर्वी सप्टेंबर महिन्यात शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



## आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी शिबिराला भेट देत लाभार्थ्यांशी संवाद साधला. दिव्यांग बांधवांचे जीवन अधिक सुलभ व्हावे आणि त्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी केंद्र सरकार सातत्याने कार्यरत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

शिबिराच्या माध्यमातून पात्र लाभार्थ्यांना व्हीलचेअर, ट्रायसायकल, श्रवणयंत्र, कृत्रिम अवयव, स्मार्टफोन आणि इतर सहाय्यक साधनांचे वितरण करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कृपेश कांडपिळे, चेतन जाधव, विविध कार्यकर्ते, स्वयंसेवक, महाविद्यालय प्रशासन तसेच ॲलिम्कोचे अधिकारी आणि डॉक्टर यांनी विशेष परिश्रम घेतल्याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांचे आभार मानले.

# गव्हाण विद्यालयात करिअर क्लबची कार्यकारिणी सभा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण-कोपर येथे प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली करिअर क्लबची कार्यकारिणी सभा झाली. सभेत करिअर क्लबच्या कार्यकारिणीची लोकशाही पद्धतीने निवड करण्यात आली. इयत्ता बारावी ‘अ’मधील विद्यार्थिनी अभिलाषा म्हात्रेची अध्यक्षपदी, तर इयत्ता नववी ‘ब’मधील स्मित मोकल याची सचिवपदी निवड झाली.



प्रास्ताविकात समुपदेशक करुणा मनोहर तांडेल यांनी कर्मवीर विद्या प्रबोधिनी अंतर्गत करिअर क्लब स्थापन करण्यामागील उद्देश स्पष्ट केला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी करिअर क्लबच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवले जात असून विद्यार्थ्यांना आपल्या आवडी, क्षमता व ध्येय यांचा विचार करून योग्य करिअरची दिशा निवडण्यास क्लबची कशी मदत होते याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षपदी निवड झालेल्या अभिलाषा म्हात्रेने मागील वर्षी करिअर क्लबमध्ये सक्रियपणे कार्य केले होते. तिच्या कार्याची दखल घेत यावर्षी तिला अध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली. पर्यवेक्षिका शशिकला पाटील यांच्या हस्ते नवनिर्वाचित अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व खजिनदार यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

अनेक वर्षे समुपदेशक म्हणून कार्यरत असलेल्या शशिकला पाटील यांनी विद्यार्थ्यांना करिअर निवडताना येणाऱ्या विविध आव्हानांबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर, लाइफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख उगले, करुणा तांडेल, अर्चना पाटील, विठ्ठल पाटील, माणिक घरत तसेच शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन हर्षला पाटील यांनी केले.

# मोहोदर गावातील कर्तृत्ववान महिलेचा विशेष सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील शिरवली ग्रामपंचायत हद्दीतील मोहोदर गावातील पतीनिष्ठा, त्याग आणि कर्तृत्वाचा आदर्श ठरलेल्या महिलेचा शनिवारी (दि. ३) त्यांच्या निवासस्थानी जाऊन पंचायत समितीच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला. पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर आणि उपसभापती भूपेंद्र पाटील यांच्या हस्ते त्यांना सन्मानपत्र प्रदान करण्यात आले.



पती दिव्यांग झाल्यानंतरही खंबीरपणे संसाराचा गाडा हाकणाऱ्या या महिलेच्या संघर्षमय जीवन प्रवासाची दखल घेत हा गौरव करण्यात आला. यावेळी केवळ सन्मानच नव्हे तर त्यांच्या आर्थिक स्वावलंबनासाठीही मदतीचा हात पुढे करण्यात आला. भाजप नेते सचिन पाटील यांच्या माध्यमातून त्यांना घरघंटी आणि मसाला कुटण्याची मशीन भेट देण्यात आली. या उपकरणांच्या माध्यमातून त्या स्वतःचा छोटा उद्योग सुरू करून आर्थिक उत्पन्न मिळवू शकतील, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. तसेच त्यांचे पती तुकाराम भगत यांना शिरवली ग्रामपंचायतीच्या माध्यमातून सहा हजार ५०० रुपयांचा धनादेश सुपूर्द करण्यात आला.

दरम्यान, याच दिवशी भाजप नेते सचिन पाटील यांनी नानोशी ग्रामपंचायत हद्दीतील अंबोली मळा या आदिवासी वाडीमध्ये भेट देत अशोक हिण्डोळे यांना धान्याचे वाटप केले. सामाजिक बांधिलकी जपत गरजू कुटुंबांना मदत करण्याचा हा उपक्रम असल्याचे त्यांनी सांगितले. दोन्ही कार्यक्रमांना पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर, उपसभापती भूपेंद्र पाटील, जिल्हा परिषद सदस्य कमला देशेकर, भाजप नेते सदाशिव वास्कर, सचिन पाटील, पंचायत समितीचे अभियंता अभिजित मटकर, संजय भगत, भानुदास भगत, कैलास भगत, राकेश पाटील, अभिमन्यू भगत, भरत भगत, बाळकृष्ण गोंधळी आदी उपस्थित होते.

## निवडक

### नफ्याचे आमिष दाखवून फसवणूक

**पनवेल** : जास्त फायद्याचे आमिष दाखवून ५२ वर्षीय इसमाची ८३ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी तिघांविरोधात सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सेक्टर ३६, रोहिंजण येथे राहणारे धर्मेश मेहनोत हे घरी असताना ऑगस्ट-सप्टेंबरदरम्यान त्यांना शिखा शर्मा आणि इतरांनी व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये ॲड केले. त्यांना लिंक पाठवून जास्त फायदा मिळण्याचे आमिष दाखवले आणि त्यांच्याकडून ८३ लाख रुपये घेतले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

### क्रेडिट कार्डमधून दोन लाख लाटले

**पनवेल** : क्रेडिट कार्डमधून एक लाख ९० हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. केशवलाल यादव हे कामोठे सेक्टर १८ येथे राहत असून आरोपीने त्यांना विश्वासात घेऊन नवीन आयसीआयसीआय बँकेचे क्रेडिट कार्ड मंजूर झाल्याचे सांगितले. बनावट लिंक आणि फाईलचा वापर करून त्यांच्या क्रेडिट कार्डमधून एक लाख ९० हजार रुपयांची फसवणूक केली.

### बनावट उतारा दाखवून फसवणूक

**पनवेल** : खात्यावर ६८ लाख ९७ हजार ६०० रुपये भरल्याचे खोटे सांगून रक्कम न देता फसवणूक केल्याप्रकरणी नवनाथ नारायण गोले, लता नवनाथ गोले (रा. सेक्टर १०, खारघर) यांच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी आनंद परसूवाणी (रा. वाशी सेक्टर ८) यांना त्यांच्या पॅराडाईज ग्रुप कंपनीच्या ओम साई कन्स्ट्रक्शनमार्फत सेक्टर ३४, खारघर या ठिकाणी बांधण्यात आलेल्या साई मन्नत इमारतीमधील फ्लॅट खरेदीमध्ये स्वतःच्या खात्यावरील बोगस आणि बनावट खाते उतारा दाखवून त्या आधारे ओम साई कन्स्ट्रक्शन कंपनीच्या खात्यावर २०१६मध्ये ६८ लाख ९७ हजार ६०० रुपये भरल्याचे नवनाथ गोले आणि त्यांची पत्नी लता गोले यांनी भासवले. सदरची रक्कम अद्यापपर्यंत त्यांना न देता त्यांची फसवणूक केली.

### मारहाणप्रकरणी गुन्हा दाखल

**पनवेल** : १६ वर्षीय मुलाला मारहाण केल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात जवळपास १० जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रियान इंटरनॅशनल स्कूल, खारघर सेक्टर ११ येथे झालेल्या बाचाबाचीचा राग मनात धरून खारघर लेक या ठिकाणी आरोपी वेदांत आर्या, मणी, अलीचे दोन भाऊ, ईशान सिंग आणि आणखी अनोळखी तीन ते चार इसमांनी १६ वर्षीय मुलगा आणि अन्य एकाला मारहाण केली.

### लग्नाचे प्रलोभन दाखवून अत्याचार

**नवीन पनवेल** : पहिल्या पत्नीसोबत घटस्फोट घेऊन पीडित महिलेसोबत लग्न करतो, असे सांगून अत्याचार करणाऱ्या अजित गोपाळ जोशी (रा. अक्षर सिल्वर क्रेस्ट, कामोठे) याच्या विरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अजित याने त्याच्या पत्नीसोबत कायदेशीर घटस्फोट घेऊन फिर्यादीसोबत लग्न करतो आणि फिर्यादींना नवीन घर घेण्यासाठी चार लाख रुपये देईन, अशी इतर अनेक खोटी आश्वासने देऊन २०२१ ते २०२६ दरम्यान त्यांच्यावर अत्याचार केला. याप्रकरणी पोलिसांनी आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# पनवेल मनपाची सेवा संकल्प अभियानांतर्गत आरोग्य शिबिरे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत ‘सेवा संकल्प अभियान’ राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी महापौर नितीन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये विविध वैद्यकीय सेवा, तपासण्या आणि शासकीय योजनांची नोंदणी विनामूल्य उपलब्ध करून दिली जात आहे.



या अभियानांतर्गत सर्व नागरिकांसाठी उच्च रक्तदाब, मधुमेह, नेत्ररोग व दंतरोग तपासणी, स्तन, गर्भाशय मुख आणि मुख कर्करोग तपासणी, गरोदर महिलांसाठी प्रसूतिपूर्व तपासणी, लसीकरण सेवा, रक्त आणि हिमोग्लोबिन तपासणी, क्षयरोग तपासणी, मलेरिया, डेंग्यू, चिकनगुनिया आणि लेप्टोस्पायरोसिस तपासणी, सिकलसेल आजार व रक्तक्षय तपासणी, संसर्गजन्य व असंसर्गजन्य रोग अशा विविध आरोग्य सेवा व तपासणी सेवा देण्यात येत आहे.तसेच गरोदर व स्तनदा मातांसह लहान बाळांसाठी योग्य आहाराबाबत मार्गदर्शन दिले जात आहे. याबरोबरच आरोग्य सेवा सुलभ करण्यासाठी माता व बालसुरक्षा कार्ड, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना नोंदणी, आयुष्मान वय वंदना कार्ड वितरण व नोंदणी, ‘निक्षय मित्र’ स्वयंसेवक नोंदणी, अवयवदान नोंदणी करण्यात येत आहे.

विशेष तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला व मार्गदर्शनही दिले जात आहे. या अभियानांतर्गत शनिवारी महापालिका कार्यक्षेत्रातील नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र नावडे व नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र असुडगाव आणि नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र १२ तळोजा फेज २ यांच्या वतीने अनुक्रमे नावडे कॉलनीतील पावशा बिल्डिंग, असुडगाव येथील अंगणवाडी सेक्टर ४ आणि तळोजा फेज १ सेक्टर १० या ठिकाणी विशेष आरोग्य शिबिरे आयोजित करण्यात आली. नावडे येथील शिबिरात परिसरातील नागरिकांसोबतच महापालिका स्वच्छता कर्मचाऱ्यांची विशेष वैद्यकीय तपासणी करण्यात आली. आरोग्य पथकाद्वारे नागरिकांना आवश्यक ते औषधोपचार पुरवण्यात आले तसेच विविध आरोग्यदायी योजनांची माहिती देण्यात आली.

महापालिकेच्या या उपक्रमामुळे स्थानिक रहिवाशांनी समाधान व्यक्त केले. या सेवा संकल्प अभियानांतर्गत होत असलेल्या आरोग्य शिबिरांचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्य वैद्यकीय अधिकारी आनंद गोसावी यांनी केले आहे. सेवा संकल्प अभियानाच्या अनुषंगाने नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५ खारघर येथे शुक्रवारी स्वच्छता दिन व वृक्षारोपण कार्यक्रम राबविण्यात आला.

# एमएनएमच्या रणवीर सिंगला ॲथलेटिक्समध्ये रौप्यपदक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या एमएनएम विद्यालय व टीएनजी कनिष्ठ विज्ञान विद्यालय, गव्हाण-कोपरच्या विद्यार्थ्याने जिल्हास्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. ३ ऑक्टोबर रोजी एचओसी, रसायनी, खालापूर येथे जिल्हास्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत १४ वर्षांखालील मुलांच्या गटात विद्यालयाचा विद्यार्थी रणवीर कमलेश सिंग याने ८० मीटर हर्डल्स या क्रीडा प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करत रौप्यपदक पटकावले.



या दमदार कामगिरीच्या जोरावर त्याची विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे. रणवीरच्या या यशाबद्दल विद्यालयाच्या प्राचार्या सायली वडवलकर, पर्यवेक्षक अरुण जोशी व पर्यवेक्षिका प्रणिता गोळे यांनी त्याचे अभिनंदन करून विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच क्रीडा शिक्षक व मार्गदर्शकांचेही विद्यालयाच्या वतीने कौतुक करण्यात आले. रणवीरच्या या यशामुळे विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील उज्ज्वल कामगिरीत आणखी एक मानाचा अध्याय जोडला गेला आहे. या यशाबद्दल त्याचे परिसरात अभिनंदन करण्यात येत आहे तसेच अनेकांनी त्याला शुभेच्छा दिल्या.

# जिल्हास्तरीय योगासन स्पर्धेत गव्हाण विद्यालयाचे घवघवीत यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण-कोपरच्या विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय योगासन स्पर्धेत दमदार कामगिरी करीत पाच सुवर्णपदके व दोन कांस्यपदके पटकावून विद्यालयाच्या शिरपेचात यशाचा आणखी एक तुरा रोवला आहे. सेंट विल्फ्रेड स्कूल, शेडुंग, पनवेल येथे रविवारी (दि. ४) जिल्हास्तरीय योगासन स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत विद्यालयातील दोन मुली व सात मुले सहभागी झाले होते.



## पाच सुवर्णपदकांसह दोन कांस्यपदके जिंकली

१४ वर्षांखालील मुलांच्या आर्टिस्टिक सिंगल प्रकारात पूर्वेश नायडू याने सुवर्णपदक पटकावले. १७ वर्षांखालील मुलांच्या आर्टिस्टिक पेअर प्रकारात श्रेयस पाटील व अजिंक्य पाटील या जोडीने सुवर्णपदक मिळवले, तर याच गटात वैयक्तिक प्रकारात परवेज खान याने कांस्यपदक पटकावले. १९ वर्षांखालील मुलांच्या आर्टिस्टिक पेअर प्रकारात आदित्य कुराडे व भाविक कोळी या जोडीने सुवर्णपदक मिळवले, तर वैयक्तिक प्रकारात अभिजीत जाधव याने कांस्यपदक पटकावले. १९ वर्षांखालील मुलींच्या आर्टिस्टिक सिंगल प्रकारात दिव्या केंद्रे हिने सुवर्णपदक मिळवले. आर्टिस्टिक पेअर प्रकारात दिव्या केंद्रे व दीक्षा म्हात्रे या जोडीने सुवर्णपदक मिळवत विद्यालयाच्या यशात भर घातली.

या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य आर. एस. भोईर, लाइफ वर्कर डी. के. म्हात्रे, क्रीडा शिक्षक सुरेश पारखे तसेच सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन करून आगामी स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेसाठी चारुशीला ठाकूर यांनी खेळाडूंसोबत उपस्थित राहून त्यांना प्रोत्साहन दिल्याबद्दल क्रीडा विभागातर्फे त्यांचे विशेष आभार मानण्यात आले.

खेळाडूंच्या या यशामागे क्रीडा शिक्षक सुरेश पारखे यांचे मार्गदर्शन, योग्य नियोजन, नियमित सराव आणि विद्यार्थ्यांकडून करून घेतलेली मेहनत यांचा मोलाचा वाटा आहे. जिल्हास्तरीय स्पर्धेत मिळवलेल्या या यशामुळे गव्हाण विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील उज्ज्वल परंपरेत मोलाची भर पडली आहे.

## संपादकीय

# भारताची क्रीडा भरारी

जपानच्या आयची–नागोया येथे पार पडलेल्या २०व्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी ८५ पदकांची कमाई करत दमदार कामगिरी नोंदवली आहे. शेवटच्या दिवशी मिळवलेल्या सोनेरी यशाने आणि मैदानावर दाखवलेल्या अभूतपूर्व आत्मविश्वासाने नव्या भारताची क्रीडा क्षेत्रातील बदलती आणि आक्रमक ताकद जागतिक पटलावर सिद्ध केली आहे.

**आयची–नागोया येथील २०व्या आशियाई क्रीडा स्पर्धेची सांगता झाली असून भारतीय क्रीडा विश्वासाठी हा क्षण अत्यंत अभिमानाचा आणि मैलाचा दगड ठरणारा ठरला आहे. यंदाच्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने २१ सुवर्ण, २७ रौप्य आणि ३७ कांस्य अशा एकूण ८५ पदकांची लयलूट करत पदतालिकेत चौथे स्थान पटकावले. स्पर्धा संपायला अवघे काही दिवस शिल्लक असताना भारताची घोडदौड काहीशी संथ वाटत होती, मात्र अखेरच्या टप्प्यात भारतीय खेळाडूंनी जो 'गोल्ड रश' (सुवर्ण मोहीम) राबवला, त्याने संपूर्ण क्रीडा जगताला थक्क केले. उझबेकिस्तानसारख्या तगड्या देशाला रौप्यपदकांच्या जोरावर मागे टाकत चौथे स्थान राखणे ही भारताच्या वाढत्या क्रीडा कौशल्याची मोठी पावती आहे. यंदाच्या यशाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे भारतीय खेळाडूंनी केवळ पारंपरिक खेळांमध्येच नाही, तर अनेक नवीन आणि अनपेक्षित खेळांमध्ये ऐतिहासिक कामगिरी करून दाखवली. धनुर्विद्या क्षेत्रात भारताने यंदा पाच सुवर्णपदकांसह तब्बल नऊ पदके जिंकून नवा इतिहास रचला. १७ वर्षांच्या कुमकुम मोहोडने मिळवलेले वैयक्तिक रिकर्व्ह सुवर्णपदक हे देशातील तरुणाईच्या अथांग क्षमतेचे प्रतीक आहे. याशिवाय गोल्फच्या मैदानावर प्रणवी उर्सने मिळवलेले सुवर्णपदक हे २४ वर्षांची प्रदीर्घ प्रतीक्षा संपवणारे ठरले. नेमबाजीत सुरुची सिंग, कमलजीत आणि नीरू धांडा यांनी आशियाई विक्रमांसह सुवर्ण वेध घेत भारताचा तिरंगा दिमाखात फडकवला. भारतीय बॉक्सिंग आणि कुस्तीपटूंनीही आंतरराष्ट्रीय पातळीवरील आपले वर्चस्व पुन्हा एकदा या स्पर्धेत अधोरेखित केले. बॉक्सिंगमध्ये लवलीना बोरगोहाइनने मिळवलेले ऐतिहासिक सुवर्ण आणि कुस्तीत अमन शेरावत तसेच सुजीत कलकल यांनी मिळवलेली सुवर्णपदके भारताची ताकद दर्शवणारी आहेत. खऱ्या अर्थाने देशाच्या भावनांना सुखावणारी कामगिरी सांघिक खेळांमध्ये पाहायला मिळाली. भारतीय महिला हॉकी संघाने तब्बल ४४ वर्षांनंतर आशियाई क्रीडा स्पर्धेचे जेतेपद पटकावून जुन्या वैभवाची पुनरावृत्ती केली. पुरुषांच्या हॉकी संघानेही आपले सुवर्णपदक राखत लॉस एंजेलिस २०२८ ऑलिम्पिकचे तिकीट थेट पक्के केले. यासोबतच क्रिकेट (पुरुष आणि महिला), कबड्डी या खेळांमध्येही भारतीय संघांनी आपले सुवर्णपदक राखण्यात यश मिळवले. ॲथलेटिक्सचा विचार केला तर २४ पदकांसह हा विभाग भारतासाठी सर्वात मोठा पदक उत्पादक ठरला. मिक्स मार्शल आर्ट्स आणि मूक टेनिस यांसारख्या खेळांमधील नवोदित खेळाडूंचे पदार्पणातील यश हे भारतीय क्रीडा संस्कृती अधिक व्यापक होत चालल्याचे स्पष्ट संकेत आहेत. या ऐतिहासिक यशामागे केवळ खेळाडूंचे मैदानावरील रक्त–घाम नाही, तर गेल्या काही वर्षांत देशातील क्रीडा धोरणांमध्ये झालेले सकारात्मक बदल आहेत. केंद्र आणि राज्य सरकारांनी खेळाडूंना दिलेले आर्थिक पाठबळ, 'खेलो इंडिया'सारख्या योजनांमधून तळागाळातून शोधलेले टॅलेंट, परदेशातील सराव दौरे आणि जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा या सर्व गोष्टींचे फळ आज मैदानात पदकांच्या रूपाने दिसत आहे. सर्व विजेत्यांचे, त्यांच्या प्रशिक्षकांचे आणि क्रीडा प्रशासनाचे मनःपूर्वक अभिनंदन! आता या यशाचा जल्लोष करत असतानाच मिळालेली गती कायम ठेवून भविष्यातील ऑलिम्पिक मोहिमेसाठी आतापासूनच नव्या जोमाने कामाला लागणे हेच पुढील उद्दिष्ट असायला हवे.**

# पर्यावरण रक्षण : आपली सामूहिक जबाबदारी



निसर्ग हा मानवाचा सर्वांत जुना मित्र आहे. आपल्या जन्मापासून मृत्यूपर्यंत निसर्ग आपल्याला अन्न, पाणी, हवा आणि निवारा देतो. सकाळची कोवळी उन्हे, पावसाच्या सरी, झाडांची हिरवळ आणि पक्ष्यांचा किलबिलाट या सर्व गोष्टी आपल्या जीवनात आनंद भरतात. निसर्गाशिवाय मानवी जीवनाची कल्पनाही करता येत नाही. म्हणूनच पर्यावरणाचे रक्षण करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. ही जबाबदारी केवळ काही लोकांची किंवा संस्थांची नसून संपूर्ण समाजाची आहे.

पर्यावरण म्हणजे आपल्या सभोवतालचे सर्व घटक. यात हवा, पाणी, जमीन, झाडे, प्राणी आणि सूक्ष्मजीव यांचा समावेश होतो. हे सर्व घटक एकमेकांशी जोडलेले आहेत. एका घटकात बदल झाला, तर त्याचा परिणाम इतर घटकांवर होतो. उदाहरणार्थ, झाडे तोडली तर पाऊस कमी पडतो. पाऊस कमी पडला तर शेतीवर परिणाम होतो. शेतीवर परिणाम झाला तर अन्नधान्याची टंचाई निर्माण होते. अशा प्रकारे निसर्गाचे चक्र एकमेकांशी गुंफलेले आहे. हे चक्र सुरळीत चालावे, यासाठी पर्यावरणाचा समतोल राखणे आवश्यक आहे. झाडे ही पर्यावरणाची फुफ्फुसे आहेत. ती कार्बन डायऑक्साइड शोषून घेऊन प्राणवायू सोडतात. झाडांमुळे हवा शुद्ध राहते. त्यांच्या मुळांमुळे जमिनीची धूप थांबते. झाडे पावसाला आकर्षित करतात. त्यांच्या सावलीत अनेक जीवांना निवारा मिळतो. फळझाडांमधून आपल्याला पौष्टिक आहार मिळतो. औषधी वनस्पतींमधून आरोग्याचे रक्षण होते. एक झाड लावणे म्हणजे अनेक पिढ्यांसाठी वरदान ठेवणे आहे. म्हणूनच झाडे लावणे आणि त्यांचे संगोपन करणे हा पर्यावरण रक्षणाचा सर्वात सोपा आणि प्रभावी उपाय आहे.

पाणी हे जीवनाचे मूळ आहे. पाण्याशिवाय कोणताही जीव जगू शकत नाही. पण आज पाण्याचा अपव्यय मोठ्या प्रमाणात होत आहे. नळ गळणे, अंघोळीसाठी जास्त पाणी वापरणे आणि शेतीत पाण्याचा अयोग्य वापर यांमुळे पाण्याची टंचाई निर्माण होते. पावसाचे पाणी वाया जाऊ न देता त्याचे संवर्धन करणे गरजेचे आहे. छतावरील पावसाचे पाणी टाकीत साठवणे, विहिरींचे पुनर्भरण करणे आणि ठिबक सिंचनाचा वापर करणे यांसारख्या उपायांनी पाण्याची बचत होते. पाण्याचा प्रत्येक थेंब जपणे ही काळाची गरज आहे. स्वच्छता आणि पर्यावरण यांचा घनिष्ठ संबंध आहे. आपला परिसर स्वच्छ ठेवला, तर रोगराई कमी होते. कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे महत्त्वाचे आहे. ओला आणि सुका कचरा वेगळा करणे, कंपोस्ट खत तयार करणे आणि पुनर्वापर करता येणाऱ्या वस्तूंचा पुनर्वापर करणे यांमुळे कचऱ्याची समस्या सुटते. प्लास्टिकचा वापर कमी करणे ही आजची मोठी गरज आहे. प्लास्टिक पिशव्यांऐवजी कापडी पिशव्या वापरणे, प्लास्टिक बाटल्यांऐवजी स्टीलच्या बाटल्या वापरणे यांसारख्या छोट्या सवयींमधून मोठा बदल घडतो.

ऊर्जेची बचत करणे हाही पर्यावरण रक्षणाचा एक भाग आहे. विजेचा काटकसरीने वापर केल्यास नैसर्गिक संसाधनांवरील ताण कमी होतो. गरज नसताना दिवे आणि पंखे बंद ठेवणे, एलईडी बल्ब वापरणे आणि सौरऊर्जेचा वापर वाढवणे यांमुळे वीजनिर्मितीसाठी लागणाऱ्या इंधनाची बचत होते. सौरऊर्जा, पवनऊर्जा यांसारखे अपारंपरिक ऊर्जा स्रोत स्वच्छ आणि शाश्वत आहेत. त्यांचा वापर वाढवणे हे आपल्या भविष्यासाठी फायदेशीर आहे. प्रत्येक व्यक्ती आपल्या दैनंदिन जीवनात पर्यावरणपूरक सवयी अंगीकारू शकते. बाजारात जाताना स्वतःची पिशवी नेणे, पाणी काटकसरीने वापरणे, वीज वाचवणे, झाडे लावणे आणि परिसर स्वच्छ ठेवणे या गोष्टी कोणालाही करता येतात. या सवयी लहान वाटत असल्या, तरी त्यांचा एकत्रित परिणाम खूप मोठा होतो. कोट्यवधी लोकांनी छोट्या सवयी बदलल्या, तर पर्यावरणावर होणारा सकारात्मक परिणाम कल्पनेपलीकडचा असेल.

मुलांमध्ये पर्यावरणप्रेम रुजवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. शाळांमध्ये पर्यावरण शिक्षण दिले जाते. पण केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नाही. मुलांना प्रत्यक्ष निसर्गाच्या सान्निध्यात न्यावे. त्यांच्या हातून झाडे लावून घ्यावीत. बागकामाची आवड निर्माण करावी. पक्षी निरीक्षणासारखे उपक्रम राबवावेत. निसर्गावर प्रेम करणारी पिढीच उद्याचे पर्यावरण रक्षण करेल. पालकांनी स्वतः पर्यावरणपूरक वागून मुलांसमोर आदर्श ठेवावा. समाजातील विविध गट एकत्र येऊन पर्यावरणासाठी काम करू शकतात. गृहनिर्माण संस्थांमध्ये वृक्षारोपणाचे कार्यक्रम राबवता येतात. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये स्वच्छता मोहीम राबवता येते. ग्रामपंचायतींच्या माध्यमातून तलावांचे खोलीकरण करता येते. युवक मंडळे जनजागृतीसाठी पथनाट्ये सादर करू शकतात. महिला बचत गट कापडी पिशव्या तयार करून प्लास्टिकला पर्याय देऊ शकतात. अशा सामूहिक प्रयत्नांतून समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते.

पर्यावरण रक्षणाचे फायदे आपल्यालाच मिळतात. शुद्ध हवा मिळाल्याने आरोग्य सुधारते. शुद्ध पाणी मिळाल्याने आजार कमी होतात. हिरवळ वाढल्याने मन प्रसन्न राहते. नैसर्गिक आपत्तींची तीव्रता कमी होते. शेतीचे उत्पादन वाढते. पर्यटनाला चालना मिळते. पर्यावरणाचे रक्षण म्हणजे पर्यायाने आपल्या स्वतःच्या आरोग्याचे, सुखाचे आणि भविष्याचे रक्षण आहे. निसर्ग आपल्याला भरभरून देतो. त्याची परतफेड करण्याची हीच योग्य वेळ आहे.
काही लोकांना वाटते की पर्यावरण रक्षण हे मोठे काम आहे आणि ते आपल्या एकट्याच्या आवाक्याबाहेर आहे. पण हा समज चुकीचा आहे. मोठे बदल नेहमी छोट्या पावलांपासून सुरू होतात. एका व्यक्तीने लावलेले झाड, वाचवलेला पाण्याचा थेंब आणि टाळलेली प्लास्टिक पिशवी यांतूनच मोठी चळवळ उभी राहते. प्रत्येकाने आपल्या परीने योगदान दिले, तर पर्यावरणाचे चित्र नक्कीच बदलेल. महत्त्वाचे म्हणजे सुरुवात करणे. आज, आत्ता, याच क्षणी सुरुवात करावी. अनेक गावांमध्ये लोकांनी एकत्र येऊन पाणलोट क्षेत्राची कामे केली आहेत.

त्यामुळे विहिरींना पाणी आले आहे. शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीकडे वळून जमिनीचा कस टिकवला आहे. शहरांमध्ये अनेक कुटुंबे ओल्या कचऱ्यापासून घरच्या घरी कंपोस्ट खत तयार करतात. काही शाळांनी आपल्या आवारात भाजीपाला बागा फुलवल्या आहेत. अशा यशोगाथा आपल्याला प्रेरणा देतात. त्या दाखवतात की इच्छाशक्ती असेल, तर कोणतेही ध्येय अवघड नाही. प्रत्येक गाव, प्रत्येक शहर हिरवे आणि स्वच्छ होऊ शकते. सणासुदीच्या काळात पर्यावरणपूरक सजावट करणे, नैसर्गिक रंग वापरणे आणि ध्वनीप्रदूषण टाळणे यांतून आपण आनंदाबरोबरच निसर्गाचीही काळजी घेऊ शकतो. चला, निसर्गमित्र बनूया आणि हिरवे भविष्य घडवूया. हाच उत्सव आहे.

शेवटी असे म्हणता येईल की, पर्यावरण रक्षण ही केवळ गरज नसून ती एक सुंदर संधी आहे. निसर्गाशी नाते जोडण्याची, भावी पिढ्यांसाठी हिरवे जग ठेवण्याची आणि निरोगी जीवन जगण्याची संधी आहे. आपण निसर्गाची मुले आहोत. आपल्या आईची काळजी घेणे आपले प्रथम कर्तव्य आहे. चला, आजच एक झाड लावूया. पाण्याचा थेंब वाचवूया. परिसर स्वच्छ ठेवूया. आपल्या छोट्या कृतींतून मोठा बदल घडवूया. हिरवे पर्यावरण, निरोगी जीवन आणि आनंदी समाज हेच आपले ध्येय असावे. या ध्येयासाठी प्रत्येकाने हातभार लावावा, हीच खरी समाजसेवा आहे. (साभार इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# गुगल अकाउंट डिलीट करण्याच्या सोप्या स्टेप्स

कधीकधी काही कारणांमुळे आपले गुगल अकाउंट आपल्याला डिलीट करायचे असते, परंतु ते नेमके कसे करायचे हे समजत नाही. त्यासाठी या काही सोप्या स्टेप्सचा उपयोग करा. कोणत्याही कारणास्तव एखाद्या व्यक्तीला त्याचे गुगल अकाउंट डिलीट करायचे असल्यास काय बरं करावं हा प्रश्न पडलेला असतो. मग तुम्ही नवीन फोन घेतला असेल म्हणून आधीचे अकाउंट नकोय किंवा विनाकारण उघडलेले अकाउंट डिलीट करायचं असल्यास ते करणं फार सोपं आहे. परंतु, अकाउंट डिलीट करण्यासोबत काही महत्त्वाच्या गोष्टी तुम्हाला लक्षात ठेवणे गरजेचे आहे, ते कोणते ते पाहा.



### अकाउंट डिलीट करण्याचे तोटे

एखादे गुगल अकाउंट कायमस्वरूपी डिलीट केल्यास, त्यासोबत तुमचे सर्व फोटो, इमेल्स, फाईल्स, कॅलेंडर यासोबतच आतापर्यंतचा सर्व डाटादेखील डिलीट होतो. जी–मेल, ड्राइव्ह, प्ले यांसारख्या सर्व सेवांचा तुम्ही उपयोग करू शकणार नाहीत. त्यासोबतच गुगलवर खरेदी केलेल्या गोष्टी जसे की सिनेमा, संगीत, प, गेम्स आणि टीव्ही कार्यक्रम या सर्व गोष्टीसुद्धा डिलीट होऊन जातील.

### रिव्ह्यू आणि डाऊनलोड

एखादे अकाउंट डिलीट करण्यापूर्वी तुम्ही तुमचा सर्व डाटा एकदा तपासून आवश्यक वाटणारा डाटा डाऊनलोड करून घेऊ शकता. जर तुमचे जी–मेल अकाउंट ऑनलाइन बँकिंग, सोशल मीडिया आणि कोणत्याही प्ससोबत लिंक्ड असल्यास, तुमच्या अकाउंटमधील रिकव्हरी ई–मेलची माहिती भरून घ्यावी.

### अकाउंट डिलीट करणे

गुगल अकाउंटमधील डाटा आणि प्रायव्हसी या सेक्शनपाशी यावे.

तेथे सर्वांत खाली 'युअर डाटा अँड प्रायव्हसी' हा पर्याय असेल, तो निवडावा.

तिथे गेल्यानंतर 'मोर' पर्याय क्लिक करून 'डिलीट युअर गुगल अकाउंट' हा पर्याय निवडावा.

त्यानंतर स्क्रीनवर येणाऱ्या सूचनांचे पालन करून आपले गुगल अकाउंट डिलीट करावे.एक गुगल अकाउंट डिलीट केल्याने त्याचा परिणाम इतर कोणत्याही अकाउंटवर होणार नाही हे लक्षात असू द्या.

# भारताचे माजी क्रिकेटपटू माधव आपटे



## निमित्त

भारताचे सुरुवातीच्या काळातील क्रिकेटपटू माधव आपटे यांचा जन्म ५ ऑक्टोबर १९३२ रोजी मुंबईत झाला. त्यांनी भारताकडून सात कसोटी सामने खेळले होते. त्यांचे पदवी शिक्षण मुंबई विद्यापीठामध्ये झाले. फाईन आर्टचे त्यांचे शिक्षण घेतले होते. ते १९८९मध्ये त्यांची भारतीय क्रिकेट कंट्रोल बोर्डाच्या अध्यक्षपदी निवड झाली होती. त्यांचे बंधू अरविंद आपटे हेसुद्धा प्रथर्मशेणी क्रिकेटपटू होते.

माधव आपटे लेगस्पिनर होते. एलफिन्सटन महाविद्यालयात असताना त्यांनी विनू मंकड यांच्या मार्ग्दर्शनात क्रिकेटचे धडे गिरविले. १९५२मध्ये त्यांनी प्रथमच रणजी स्पर्धेत सौराष्ट्रकडून पदार्पण केले. विजय मर्चंट यांना दुखापतीमुळे संघाबाहेर ठेवल्याने ही संधी त्यांना मिळाली होती. नंतर १९५३मध्ये वेस्ट इंडिजच्या दौर्‍यासाठी त्यांची निवड झाली. पोर्ट ऑफ स्पेन येथे झालेल्या सामन्यात त्यांनी चांगल्या धावा काढून सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते.

माधव आपटे यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात १९४८मध्ये केली. १९५२मध्ये पाकिस्तानविरुद्धच्या कसोटी सामन्यातून भारताकडून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. आपटे यांनी १९५२–५३ या काळात सात कसोटी सामन्यांमध्ये भारताचे प्रतिनिधीत्व केले. या सात कसोटी सामन्यात ४९.२७च्या सरासरीने ५४२ धावा केल्या होत्या. यामध्ये त्यांनी एक शतक आणि तीन अर्धशतके केली होती.

विंडीजमध्ये सर्वोत्तम वैयक्तिक खेळीचा १६३ धावांचा त्यांचा हा विक्रम १८ वर्षे अबाधित राहिला होता. ते शेवटचा कसोटी सामना वेस्ट इंडिजविरुद्ध मार्च–एप्रिल १९५३मध्ये खेळले.

आपटे यांनी मुंबईकडून खेळताना रणजी क्रिकेटमध्ये २०७० धावा केल्या. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये त्यांच्या नावावर सहा शतकांसह ६७ सामन्यांत ३३३६ धावा आहेत. क्रिकेटमधून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी मुंबईचे नगरपालपद भूषविले होते.

आपटे यांनी प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये ६७ सामन्यात ३८.७९च्या सरासरीने ३३३६ धावा केल्या होत्या. यामध्ये त्यांनी सहा शतके आणि १६ अर्धशतके केली. त्यांनी १९५८–५९ आणि १९६१–६२मध्ये रणजी ट्रॉफीचे विजेतेपद मिळवलेल्या मुंबई संघाचे नेतृत्वही केले होते.

भारताचे माजी क्रिकेटपटू विनू मंकड यांनी आपटेंच्या क्रिकेट कारकिर्दीत महत्त्वाची भूमिका निभावली होती. आपटे वयाच्या ७० वर्षापर्यंत कांगा लीगमध्ये खेळत होते. त्यांचा भाऊ अरविंद आपटेही भारताकडून एक कसोटी सामना खेळला तसेच आपटेंचा मुलगा वामन यांनी भारताकडून स्क्वॉश खेळले आहे. भारताचे माजी कसोटीपटू माधव आपटे यांचे २३ सप्टेंबर २०१९ रोजी वयाच्या ८६व्या वर्षी ब्रीच कँडी हॉस्पिटलमध्ये निधन झाले.

(साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# सकाळी रिकाम्या पोटी ज्यूस पिणे शरीराला अपायकारक!

फळांमध्ये अनेक पोषकतत्व असतात. विविध सिझनची फळे खाल्ल्याने आपल्या शरीराला पोषकतत्व मिळत असतात. अनेक आजारांपासून त्यामुळे आपली सुटका होते. फळांचा ज्युस पिल्याने आपल्याला त्यातील पोषक घटक मिळतात असा तुमचा समज असेल तर तो चुकीचा आहे. सकाळी उठल्या उठल्या उपाशीपोटी फळांचा रस पिण्याचे अनेक तोटे आपल्याला होऊ शकतात.



जेव्हा आपण रात्री झोपतो तेव्हा आपले शरीर मेन्टेनन्स करीत असते. त्यावेळी आपल्या पोटात अनेक प्रकारचे केमिकल्स निघत असतात. पचनासाठी एसिड निघत असते. पचनप्रक्रीये दरम्यान बायप्रोडक्टच्या रुपात एसिड जमा होत असते. हे गरजचे असते, परंतु तुम्ही जर सकाळचे ज्युस प्यायले तर पोटातील ॲसिडचे प्रमाण जास्त होईल. त्यामुळे चुकूनही सकाळी उठल्याउठल्या कोणतेही फळ खाऊ नका किंवा ज्युसदेखील पिऊ नका.

न्युट्रीशियन डॉ. प्रियंका रोहतगी यांनी सांगितले की, काही जण सकाळी फिरायला जातात आणि मिक्स फ्रुट ज्युस पितात. जरी ते मिक्स फ्रुट ज्यूस असले तरी नुकसान कारक ठरेल, परंतु हिरव्या भाज्यांचा ज्युस आणि फळांचा ज्युस एकत्र प्यायल्याने किडनी स्टोनचा धोका असतो.

हिरव्या भाज्या पालक किंवा ब्रोकलीत ऑक्जेलिक एसिड असते आणि फळांत साइट्रीक एसिड असते. जेव्हा ते पोटात जाते तेव्हा साइट्रिक ॲसिड ऑक्जेलिक एसिडला वेगाने शोषून घेते. इतक्या ऑक्जेलिक एसिडची गरज नसते. परिणामुळे ते किडनी स्टोन किंवा गॉल ब्लॅडर स्टोनमध्ये परिवर्तित होते. त्यामुळे सकाळी सकाळी फ्रुट ज्युसमध्ये भाज्यांचे ज्युस मिक्स करुन पिऊ नका ते आरोग्यासाठी अपायकारक असते.

ज्यांना मधुमेहाचा त्रास आणि किंवा गॅसेसचा त्रास आहे त्यांनी सकाळचा रस पिण्याच्या फंद्यात पडू नये. ज्युसमध्ये पल्प असल्याने डायबिटीज असलेल्यांनी ज्युस पिऊ नयेच. सर्वसाधारण लोकांनीदेखील सकाळी उपाशी पोटी ज्युस प्यायल्यास त्यांना हा त्रास होऊ शकतो. दिवसाचे लंच आणि रात्रीच्या डिनरच्या अगोदर काही तास आधी ज्यूस पिण्यासाठी योग्य वेळ आहे. म्हणजेच सकाळच्या नाश्त्यानंतर अर्ध्या तासाने तुम्ही ज्यूस प्यायला तरी चालेल. कारण त्यावेळी शरीरात ॲसिडचे प्रमाण इतके नसते.

# कोकणचा चेहरामोहरा बदलणार!

## समृद्धी महामार्ग थेट वाढवण बंदराशी जोडणार; भूसंपादन आणि सर्वेक्षण सुरू

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्राच्या पायाभूत सुविधांच्या विकासाला गती देण्यासाठी समृद्धी महामार्ग थेट कोकण किनारपट्टी आणि पालघरमधील प्रस्तावित वाढवण बंदराशी जोडून राज्याच्या आर्थिक प्रगतीचा नवा मार्ग तयार केला जात आहे. या नेटवर्कमुळे कोकणचा चेहरामोहराच बदलून जाणार आहे.



नागपूर ते मुंबई जोडणारा ७०१ किमी लांबीचा मुख्य समृद्धी महामार्ग पूर्ण झाला आहे. या महामार्गाला पालघरमधील प्रस्तावित वाढवण बंदराशी थेट जोडण्यासाठी १०४.८९ किमी लांबीच्या भरवीर–वाढवण एक्सप्रेसवेची आखणी करण्यात आली आहे. सुमारे ११,००० कोटी रुपयांच्या या प्रकल्पासाठी सध्या भूसंपादन आणि सर्वेक्षणाचे काम वेगाने सुरू आहे.

यासोबतच मुंबई–नाशिक महामार्गावरील आमणे ते वडपे दरम्यानच्या रुंदीकरणाचे कामही प्रगतीपथावर आहे. समृद्धी महामार्गाचा शेवटचा टप्पा ठाण्यातील आमणे येथे समाप्त होत असून, तेथून पुढे कल्याण–तळोजा रिंग रोड आणि 'मल्टी मॉडेल कॉरिडोअर'द्वारे हा मार्ग थेट रायगड जिल्ह्यातील जेएनपीए पोर्ट, नवी मुंबई आणि रायगड जिल्ह्याशी जोडला जाणार आहे.

याशिवाय, नाशिकमधील भरवीर ते पालघरमधील वाढवण बंदर अशा १०४.८९ किमीच्या जोडमार्गामुळे उत्तर महाराष्ट्रातून थेट कोकण किनारपट्टी आणि बंदरांपर्यंत मालवाहतूक विनाअडथळा शक्य होणार आहे. तसेच मुंबई अटल सेतू आणि प्रस्तावित वर्सोवा–विरार कोस्टल रोडमुळे समृद्धीवरून येणारी वाहतूक थेट रेवस–रेड्डी सागरी महामार्गावर उतरून संपूर्ण कोकणाशी जोडली जाईल.

### मुंबई ते सिंधुदुर्ग प्रवासाच्या वेळेत मोठी बचत

***मुंबईतील कोस्टल रोड आणि अटल सेतूमुळे किनारपट्टीवरील वाहतुकीला नवी दिशा मिळाली आहे. अटल सेतूपुढे रेवस जोडमार्गाने सागरी महामार्गाला जोडण्याचे काम आखण्यात आले असून, दुसरीकडे वर्सोवा–विरार कोस्टल रोडच्या माध्यमातून हा मार्ग पुढे वाढवण बंदरापर्यंत जोडला जाणार आहे. हे सर्व सागरी जोडमार्ग पूर्ण झाल्यानंतर मुंबई ते सिंधुदुर्ग प्रवास सध्याच्या १०–१२ तासांवरून अवघ्या ५ ते ६ तासांवर येणार आहे.***

सुमारे ७६,२२० कोटी रुपये खर्चाचा वाढवण बंदर प्रकल्प जगातील अव्वल १० बंदरांमध्ये स्थान मिळवण्याच्या दृष्टीने विकसित केला जात आहे. २३.२ दशलक्ष टीईयूएस माल हाताळण्याची प्रचंड क्षमता असलेल्या या बंदरासाठी २२,३२३ कोटी रुपयांच्या ऑफ–शोअर टेंडर प्रक्रियेला गती मिळालेली आहे.

या पहिल्या टप्प्याचे काम २०३० पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. रायगडमधील रेवस ते सिंधुदुर्गातील रेड्डी दरम्यानचा हा ५०० किमीहून अधिक लांबीचा सागरी महामार्ग (एमएसएच–४) सुमारे २७,००० कोटी रुपये खर्चून उभारला जात आहे. या मार्गातील महत्त्वाचा भाग म्हणजे विविध खाड्यांवर बांधले जाणारे १४ मोठे पूल आहेत. सध्या आग्राव, बाणकोट आणि जयगड खाड्यांवरील पुलांची कामे वेगवेगळ्या टप्प्यांवर सुरू आहेत. हे सर्व पूल पूर्ण करून २०२९–३० पर्यंत संपूर्ण महामार्ग अखंड वाहतुकीसाठी खुला करण्याचे नियोजन आहे.

# रोह्याच्या सुतारवाडीत विहिरीत उडी घेत मायलेकाची आत्महत्या

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील सुतारवाडी येथील खिलारे फार्म हाऊसवर काम करणाऱ्या मायलेकांनी विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना शनिवारी उघडकीस आली.

मृतांमध्ये मनीषा काशीकर (८०) आणि मंदार काशीकर (४३, रा. पुणे यांचा समावेश आहे. खिलारे फार्म हाऊसमधील विहिरीत दोघांचे मृतदेह आढळून आल्यानंतर कोलाड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह बाहेर काढण्यासाठी पोलिसांनी सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्थेच्या रेस्क्यू पथकाची मदत घेतली.

रेस्क्यू पथक घटनास्थळी दाखल झाले असता विहिरीच्या पाण्यावर महिलेचा मृतदेह तरंगताना दिसून आला तसेच विहिरीजवळ महिला व पुरुषांच्या चपला आढळल्याने महिलेचा



मुलगाही विहिरीत असल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. त्यानंतर रेस्क्यू पथकाने विहिरीत शोधमोहीम राबवून मंदार काशीकर यांचा मृतदेहही बाहेर काढला.

मायलेक दोघेही आजारपणामुळे त्रस्त होते. सततच्या आजारपणाला कंटाळून नैराश्यातून त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याची प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली. घटनेचा पुढील तपास कोलाड पोलीस करीत आहेत.

# तलावातील दुर्गंधीयुक्त पाणी पाताळगंगा नदीत सोडल्याने परिसरात दुर्गंधी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील पाताळगंगा नदी परिसरात औद्योगिक प्रदूषणाचा प्रश्न गंभीर असतानाच नदीकिनारी असलेल्या काही तलावांमध्ये कथित बेकायदा मांगूर मासेपालन सुरू असल्याच्या तक्रारींमुळे जलप्रदुषणाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

महड, धामणी, पौंध, कोपरी आणि चांभार्ली परिसरातील काही तलावांमध्ये मांगूर पालन केले जात आहे.माशांना मोठ्या प्रमाणात खाद्य टाकले जात असल्याने त्यातील शिल्लक खाद्य तलावाच्या पाण्यात कुजते. त्यामुळे पाण्याची गुणवत्ता खालावत असून दुर्गंधी निर्माण होते. काही ठिकाणी तलावातील दुर्गंधीयुक्त पाणी ठराविक कालावधीनंतर नदीपात्रात सोडले जात असल्याचाही आरोप करण्यात येत आहे.

मांगूर माशांना खाद्य म्हणून कोंबड्यांचे टाकाऊ अवशेष वापरले जात असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. हे खाद्य तलावात कुजल्याने दुर्गंधी वाढत असल्याची तक्रार आहे. तसेच मृत माशांची योग्य पद्धतीने विल्हेवाट न लावता काही ठिकाणी ते जाळले जात असल्याने महड गाव, देवस्थान परिसर, खालापूर तसेच सावरोली पूल परिसरात दुर्गंधीचा त्रास जाणवत असल्याचे नागरिक सांगतात.पावसाने विश्रांती घेतल्यानंतर पाताळगंगा नदीची पाणीपातळी कमी झाल्याने नदीकिनारी असलेल्या तलावांमधून येणाऱ्या दुर्गंधीचा त्रास अधिक जाणवत असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे.

पाताळगंगा नदीचे पाणी परिसरातील नागरिक विविध दैनंदिन गरजांसाठी वापरतात. त्यामुळे दूषित किंवा दुर्गंधीयुक्त पाणी नदीत मिसळत असल्यास त्याचा नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता असल्याची चिंता स्थानिकांकडून व्यक्त होत आहे. तहसीलदार, मत्स्य विभाग आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने संयुक्तपणे संबंधित तलावांची तातडीने पाहणी करून पाण्याचे नमुने घ्यावेत. नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करावी, तसेच तलाव आणि परिसरातील दुर्गंधी व संभाव्य प्रदूषण रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.



# केएमसी महाविद्यालयात अभिजात मराठी भाषा दिवस

**खोपोली : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन मराठी भाषा विभागाच्या निर्देशानुसार ३ ऑक्टोबर – अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस के.एम.सी. महाविद्यालयात मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

यानिमित्ताने आयोजित केलेल्या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा रायगड जिल्हा ग्रंथालय संघाचे संचालक संतोष जंगम यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष अबूबकर जळगावकर, कार्यवाह किशोर पाटील, महाविद्यालयाचे उपाध्यक्ष दिलीप पोरवाल, संचालक भास्कर लांडगे, रायगड जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष संजय बोंदार्डे, प्राचार्य डॉ.मकरंद वझल, सेवानिवृत्त



प्राचार्य डॉ.नरेंद्र पवार हे मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

"मराठी भाषेला समृद्ध आणि संपन्न वारसा आहे. प्राचीन अशी परंपरा आहे. मराठी भाषेचे वैभव नव्या पिढीने समजून घ्यावे. मराठी भाषेच्या विकासात आपण सर्वांनीच योगदान देण्याची गरज आहे. वाचन संस्कृती व वाचन चळवळ वृद्धिंगत व्हावी यासाठी उत्तम ग्रंथांचे विद्यार्थी आणि रसिक वाचकांनी नियमित वाचन करावे", असे आवाहन संस्थेचे कार्यवाह किशोर पाटील यांनी याप्रसंगी बोलताना केले. स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून महाविद्यालयाने आयोजित केलेल्या उपक्रमाबद्दल त्यांनी सर्वांचे कौतुक केले.

मराठी भाषा व साहित्य मंडळ, सांस्कृतिक विभाग, ग्रंथालय व आयक्यूएसीच्या सहकार्याने ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. त्याला विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक रसिक वाचकांचा उदंड उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मराठी विभाग प्रमुख डॉ.भाऊसाहेब नन्नवरे व प्रा.प्रिया नेरलेकर यांनी लिहिलेल्या 'उपयोजित मराठी'या पुस्तकाचे प्रकाशन पाहुण्यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

# पोलादपुरातील सहाव्या पुलाला 'स्पायरल लॅडर्स'

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर शहरातील पाच पुलांच्या बांधकामानंतर पूर्व आणि पश्चिमेच्या सर्व्हिस रोडवरील पादचाऱ्यांना मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग ओलांडून ये–जा करण्यासाठी पादचारी पूल उभारण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून सुरु झाली. पादचारी पूल बांधून झाल्यानंतर या पुलावर जाण्यासाठी पादचाऱ्यांना जिना चढून जावे लागेल हे निश्चित झाले असताना दोन्ही सर्व्हिस रोडवर चक्क 'स्पायरल लॅडर्स' जोडण्यात आले.

मुंबई–गोवा महामार्गावरून तांबडभुवन, साईनाथ नगर, सैनिक नगर रस्ता, गोकुळ नगर रस्ता, खासगी इंग्रजी माध्यमाची शाळा तसेच पश्चिमेकडील सर्व्हिस रोडला जोडण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या मागे व लगत प्रत्येकी एक पूल असे दोन पुल, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेपासून जुन्या पोलीस



ठाण्यापर्यंत तिसरा पूल, पोलादपूर एसटी स्थानकातील गाड्या बाहेर पडण्यासाठी एक आणि गाड्या स्थानकात जाण्यासाठी एक असे पाच पूल बांधण्यात आले आहेत. या पाचही पुलांवरून रयत शिक्षण संस्था, जाखमातानगर अथवा भैरवनाथनगर, प्रभातनगर पूर्व भागातील जनता सद्यस्थितीत ये–जा करीत आहे. ज्यांच्यासाठी सहाव्या पादचारी पुलाच्या मागणीने गेल्या काही वर्षांपासून जोर धरला आहे.

पादचारी पुलाच्या कामाला सुरुवात झाली. त्यावर तीन महिन्यांपूर्वी गर्डर टाकण्यात येऊन काम थांबले होते.अचानक चार दिवसांपूर्वी पुलाच्या पूर्व आणि पश्चिम सर्व्हिस रोडवरील पादचाऱ्यांना पुलावर जाण्यासाठी 'स्पायरल लॅडर्स'चा जिना उभा करण्यात आला पुलावर जाण्यासाठी उभारलेल्या जिन्याची रचना पाहून अत्यंत अरुंद आणि धोकादायक स्वरूपाच्या या जिन्यावर लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिकांना सुरक्षितपणे चढता येणार नसल्याने या कामाला विरोध केला.

राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार पक्षाच्या महिला शहराध्यक्ष सारिका विचारे यांनी तहसीलदार कपिल घोरपडे यांना लेखी निवेदन देऊन 'स्पायरल लॅडर्स'चा जिना पाहून नागरिकांचा संताप वाढत असल्याने काम थांबविण्यासंदर्भात आवाहन केले. परिणामी, दिवसभर युध्दपातळीवर सुरू असलेले 'स्पायरल लॅडर्स'चा जिना उभारण्याचे काम थांबविण्यात आले.

# खैरे खुर्दमधील उर्दू शाळेच्या नव्या वास्तूचे दोन महिन्यांत लोकार्पण –खासदार सुनील तटकरे

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील खैरे खुर्द येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेच्या बहुप्रतीक्षित सुमारे ३७ लाख रुपयांचे नवीन इमारतीचे भूमिपूजन खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते शुक्रवार दि. (२) रोजी करण्यात आले. गेल्या तीन–चार वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रश्नाला अखेर मुहूर्त मिळाला असून, कामाला गती देऊन विद्यार्थ्यांच्या नाताळ सुट्टीपूर्वी नवीन इमारतीचे लोकार्पण करण्याचा प्रयत्न केला जाईल, अशी ग्वाही तटकरे यांनी दिली.



या वेळी रायगड जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा बांधकाम सभापती मधुकर पाटील, रोहा पंचायत समिती सभापती विजया पाशिलकर, अलिबाग विधानसभा कार्याध्यक्ष मनोजकुमार शिंदे, माजी जिल्हा परिषद सदस्य उपसभापती रामा सकपाळ, उप सभापती संजय माडलुस्कर , सरपंच हरचंद्र वाजंत्री , सरपंच मुजम्मील गिते , सरपंच नितिन डबिर, सरपंच अतिश मोरे , संतोष भौंड यांच्यासह पदाधिकारी, ग्रामस्थ, शिक्षक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

दरम्यान तटकरे म्हणाले की,शाळेच्या नवीन इमारतीसाठी गेल्या वर्षी जिल्हा नियोजन मंडळातून निधीची तरतूद करण्यात आली होती. मात्र, स्ट्रक्चरल ऑडिट आणि आवश्यक तांत्रिक परवानग्यांच्या प्रक्रियेमुळे प्रत्यक्ष कामाला विलंब झाला.आता आवश्यक प्रक्रिया पूर्ण झाल्याने कामाला गती देण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या आहेत.

नवीन इमारत विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारी असावी, अशी अपेक्षा व्यक्त करत तटकरे म्हणाले, "दोन खोल्या खाली आणि दोन खोल्या वर अशा स्वरूपात देखणी वास्तू उभी करा. या इमारतीकडे पाहताना विद्यार्थ्यांच्या मनात अभिमान निर्माण झाला पाहिजे. कामाचा दर्जा कायम ठेवत विद्यार्थ्यांच्या नाताळ सुट्टीपूर्वी एखाद्या रविवारी लोकार्पण करता यावे, यासाठी प्रयत्न करण्याचे त्यांनी सांगितले.

अलीकडील समुद्र दुर्घटनेचा संदर्भ देत तटकरे यांनी मृतांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त केली. अशा दुर्घटनांमुळे कुटुंबांवर होणाऱ्या आघाताची जाणीव व्यक्त करत त्यांनी दिवेआगर, हरिहरेश्वर, काशीद, अलिबाग आदी समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक व्यवस्था उभारण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले. पर्यटकांना समुद्रविहाराबरोबरच सुरक्षितपणे समुद्रदर्शन आणि निसर्गाचा आनंद घेता यावा, यासाठी आवश्यक उपाययोजना उभ्या करणे गरजेचे आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.

तसेच म्हसाडी धरणाचा प्रश्न मार्गी लावणार परिसरातील दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या म्हसाडी धरणाच्या प्रश्नावरही तटकरे यांनी भाष्य केले. प्रकल्पासंदर्भात यापूर्वी प्रशासकीय प्रक्रिया व चौकशी झाल्याचे सांगत संबंधित विभाग आणि मंत्र्यांशी चर्चा करून हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन त्यानी दिले. धरणामुळे पाणीपुरवठ्यासोबतच परिसराच्या विकासाला आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळू शकते, असे त्यांनी यावेळी नमूद केले.

# माजी विद्यार्थ्यांकडून तळा येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**तळा : प्रतिनिधी**

तळा मराठी येथे शाळेचे माजी विद्यार्थी डॉ. विजय शृंगारपुरे यांच्या पुढाकाराने व महेंद्र कजबजे व पुरूषोत्तम मुळे यांचे प्रयत्नाने माजी विद्यार्थी मोहन वर्तक यांचे माध्यमातून हे शैक्षणिक साहित्य प्राप्त झाले असून या शैक्षणिक साहित्याचे वाटप विद्यार्थ्यांना करण्यात आले. माजी विद्यार्थी म्हणून आपल्या शाळेशी असलेले ऋणानुबंध जपत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी केलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

या प्रसंगी डॉ. शृंगारपुरे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना उपयुक्त शैक्षणिक पुस्तके व साहित्य वितरित करण्यात आले. शैक्षणिक साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत होता. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. शृंगारपुरे यांनी विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यास करावा, वाचनाची आवड जोपासावी, शिक्षकांचे मार्गदर्शन घेऊन आपले ध्येय निश्चित करावे आणि भविष्यात आपल्या शाळेचे व गावाचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन केले.

शाळेतील शिक्षकांनी माजी विद्यार्थ्यांनी शाळेच्या विकासासाठी व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी घेतलेला पुढाकार हा इतर माजी विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी असल्याचे सांगितले.कार्यक्रमास शाळेतील शाळा व्यवस्थापन अध्यक्ष,सदस्य,पालक , मुख्याध्यापक , शिक्षकवृंद, विद्यार्थी आदि मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावणारा आणि सामाजिक बांधिलकी जपणारा हा उपक्रम कौतुकास्पद ठरत आहे.



# प्लास्टिकमुक्ती जागरूकता अभियान

## कापडी पिशव्यांचे वाटप



**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित 'सेवा संकल्प अभियान : सेवा मेरा योगदान' या सेवा सप्ताहाअंतर्गत सीबीडी बेलापूर येथील वारकरी भवन येथे प्लास्टिकमुक्ती जागरूकता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. आमदार मंदा म्हात्रे यांच्या संकल्पनेतून आणि नेतृत्वाखाली हा उपक्रम पार पडला.

पर्यावरणाचे संतुलन जपण्यासाठी आणि नवी मुंबई अधिक स्वच्छ, सुंदर व हरित बनवण्यासाठी आमदार मंदा म्हात्रे गेल्या अनेक वर्षांपासून विविध उपक्रम राबवत आहेत. याच मोहिमेचा भाग म्हणून आयोजित कार्यक्रमात 'प्लास्टिक हटवूया, नवी मुंबई स्वच्छ आणि हरित बनवूया' तसेच 'प्लास्टिक सोडा, पर्यावरण जोडा' हा संदेश देत उपस्थितांना कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. दैनंदिन व्यवहारात प्लास्टिकचा पूर्णपणे त्याग करण्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना आमदार मंदा म्हात्रे म्हणाल्या की, नवी मुंबईला प्रदूषणमुक्त आणि पर्यावरणपूरक बनवणे केवळ एक मोहीम नसून आपल्या सर्वांची राष्ट्रसेवा आहे. निसर्गाचे संवर्धन करण्यासाठी आणि भावी पिढीला हरित भविष्य देण्यासाठी प्रत्येकाने स्वतःपासून सुरुवात करून प्लास्टिक पिशव्यांचा वापर थांबवून कापडी पिशव्यांचा वापर सवय म्हणून अंगीकारला पाहिजे.

यावेळी भाजप जिल्हाध्यक्ष राजेश पाटील, गोपाळराव गायकवाड, प्रभाकर कांबळे, ज्योती पाटील, किरण वर्मा, आरती राऊळ, किशन राठोड, राजू कोळी, मनोज म्हात्रे, मनी कोणार, जयदेव ठाकूर, अलका कामत, सुरेखा बामणकर, रेखा गोदाम, मिनारानी ओझा, कांतिदेवी चौधरी, सीबीडी बेलापूरमधील भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि अखिल भारतीय योग केंद्राचे सदस्य व स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

# कोपरखैरणेत लक्षवेधी स्वच्छता उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या घटनात्मक पदावरील कारकिर्दीला २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त १७ सप्टेंबरपासून 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. या अंतर्गत महापौर सुजाता पाटील व आयुक्त कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार नवी मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभागांमार्फत नागरिकांना सेवांचा लाभ देण्यासाठी मोठ्या प्रमाणात सेवा योगदान उपक्रम हाती घेण्यात आले आहेत.

नवी मुंबई ही स्वच्छ सर्वेक्षणामध्ये सुरुवातीपासूनच राज्यातील सर्वांत स्वच्छ शहराची मानकरी आहे. तसेच देशातील सर्वोत्तम स्वच्छ शहरांच्या 'सुपर स्वच्छ लीग' या विशेष कॅटेगरीत मानांकित असलेले 'सुपर स्वच्छ शहर' आहे. शहरातील दैनंदिन स्वच्छता कार्यवाहीवर अद्ययावत अशा इंटिग्रेटेड कमांड कंट्रोल सेंटरच्या माध्यमातून निरीक्षण आणि नियंत्रण ठेवले जात असून याद्वारे कचरा



वाहतूक करणाऱ्या वाहनांचे मार्ग व त्यांच्या वेळा यावरही बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. या माध्यमातून शहर स्वच्छतेला गतिमानता लाभली आहे. स्वच्छता ही नियमितपणे करण्याची गोष्ट असून ती सर्वांची एकत्रित अशी सामूहिक जबाबदारी आहे. म्हणूनच सेवा संकल्प अभियानांतर्गत 'स्वच्छता ही सेवा' मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे.

सेवा संकल्प अभियानाचा प्रारंभ नवी मुंबई महानगरपालिकेने मुख्यालयाच्या प्रांगणात हिरवळीवर स्वच्छ भारत मिशनचे बोधचिन्ह असलेल्या महात्मा गांधीजींच्या चष्म्याचे प्रतीकचिन्ह मानवी रांगोळीतून साकारून अत्यंत उत्साहात केला होता. त्याची दखल स्वच्छ भारत मिशनमार्फत राष्ट्रीय पातळीवर त्यांच्या समाजमाध्यमांवरून घेण्यात आली होती.अशाच प्रकारचा आणखी एक लक्षवेधी उपक्रम सेवा योगदान उपक्रमांतर्गत अतिरिक्त आयुक्त सुनील पवार व घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त अजय गडदे यांच्या नियंत्रणाखाली कोपरखैरणे येथे राबविण्यात आला.

यामध्ये 'स्वच्छता ही सेवा' अर्थात इंग्रजी 'SHS' या अक्षर रचनेत २३ इलेक्ट्रिक कचरा वाहतूक वाहने उभी करण्यात आली. याद्वारे स्वच्छतेची सुरुवात आपल्यापासून होत असल्याने सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांतून आपण आपापल्या परिसराची काळजी घेऊया आणि आपल्या नवी मुंबई शहराला स्वच्छतेमध्ये देशात अग्रभागी ठेवूया, असा निश्चय करण्यात आला. या अक्षर रचनेमध्ये प्रदूषणमुक्त इलेक्ट्रिक वाहनांचा उपयोग करून स्वच्छतेसोबतच पर्यावरण रक्षणाचाही संदेश प्रसारित करण्यात आला.

# नवी मुंबईत उद्या पाणीपुरवठा बंद

**नवी मुंबई : प्रतिनिधी**



मोरबे मुख्य जलवाहिनीवरील विविध कामांसाठी नवी मुंबईतील पाणीपुरवठा मंगळवारी (दि. ६) १६ तास बंद ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे नवी मुंबईतील अनेक विभागांसह सिडकोच्या खारघर आणि कामोठे नोडमधील पाणीपुरवठ्यावर परिणाम होणार आहे. काम पूर्ण झाल्यानंतर बुधवारी सकाळचा आणि सायंकाळचा पाणीपुरवठा कमी दाबाने होण्याची शक्यता आहे.

नवी मुंबई महापालिकेने दिलेल्या माहितीनुसार मंगळवारी सकाळी १० ते बुधवारी पहाटे २ या कालावधीत ही कामे केली जाणार आहेत. भोकरपाडा जलशुद्धिकरण केंद्रातील १३.५ दशलक्ष लिटर क्षमतेच्या पंपचा चॅनेल विलग करण्यासाठी एमएस प्लेट बसविणे, नवीन मीटरिंग किऑस्क बसविणे तसेच मोरबे मुख्य जलवाहिनीवर जलमापक बसविण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. भोकरपाडा जलशुद्धिकरण केंद्राजवळील २,०५० मि.मी. व्यासाच्या मोरबे मुख्य जलवाहिनीवर जलमापक बसविण्यात येणार आहे. याशिवाय सीबीडी सेक्टर ७ येथे १,८०० मि.मी. व्यासाचा बटरफ्लाय व्हॉल्व्ह बसविण्यात येणार आहे. वाशीतील अरेंजा सर्कलजवळ मोरबे मुख्य जलवाहिनीला जोडलेल्या वितरण जलवाहिनीवर ७०० मि.मी. व्यासाचा, तर महापे येथे ९०० मि.मी. व्यासाचा बटरफ्लाय व्हॉल्व्ह बसविण्यात येणार आहे.

या कामांमुळे मुख्य जलवाहिनीवरील पाणीपुरवठा बंद ठेवण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. या बंदचा परिणाम बेलापूर, नेरुळ, वाशी, तुर्भे-सानपाडा, कोपरखैरणे, घणसोली आणि ऐरोली विभागांवर होणार आहे. तसेच सिडकोच्या खारघर आणि कामोठे नोडमधील पाणीपुरवठाही बंद राहणार आहे. पाणीपुरवठा पूर्ववत केल्यानंतर जलवाहिनीतील प्रवाह सुरळीत होण्यासाठी काही वेळ लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे बुधवारी सकाळचा आणि सायंकाळचा पाणीपुरवठा कमी दाबाने होऊ शकतो. नागरिकांनी पाणीपुरवठा बंद राहण्याच्या कालावधीचा विचार करून आवश्यक पाणीसाठा करून ठेवावा आणि उपलब्ध पाण्याचा जपून वापर करावा, असे आवाहन महापालिकेचे शहर अभियंता शिरीष आरदवाड यांनी केले आहे.

# फुंडे विद्यालयात 'रयत'चा वर्धापन दिन उत्साहात

## स्पर्धेतील विजेत्यांचा सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या तुकाराम हरी वाजेकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे शाखेत बहुजनांचे कैवारी, शिक्षणाची गंगोत्री खेडोपाडी नेणारे,आधुनिक भगीरथ, रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, थोर शिक्षणमहर्षी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेचा १०७वा वर्धापन दिन सोहळा उत्साहात संपन्न झाला.

यावेळी विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू, प्राचार्य बी. बी. साळुंखे, उपमुख्याध्यापिका एस. डी. थोरात, पर्यवेक्षिका एस. एस. पाटील, वरिष्ठ लिपिक नितीन म्हात्रे, नवनीत ठाकूर व उपस्थित सेवकवृंदांच्या हस्ते कर्मवीर भाऊराव पाटील व त्यागमूर्ती लक्ष्मीबाई पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी सुहानी प्रजापती या विद्यार्थिनीने रयत गीत व रयत माऊली गीताचे सुमधुर





आवाजात सादरीकरण केले. कर्मवीर जयंतीनिमित्त वक्तृत्व, निबंध, रांगोळी, चित्रकला या स्पर्धांमध्ये प्रावीण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. कांचन घुगे, श्रेया शिंदे यांनी कर्मवीरांचे जीवनकार्य सांगितले. विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक एस. डी. म्हात्रे यांनी रयत शिक्षण संस्थेचा इतिहास सांगितला.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी वेगवेगळ्या जातीधर्माच्या विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळी वसतिगृहे व शाळा न काढता सर्व जातीधर्माच्या मुलांसाठी एकत्र राहण्याची व परस्परसंबंधातून सहयोग, सहकार्य व संवाद वाढवण्याची व्यवस्था करून त्यांच्यातील मानवतेला व करुणेला वृद्धिंगत केले. प्रत्यक्ष कृतीतून त्यांनी राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत केली. तेच काम त्यांच्या विचारानुसार आजही रयत शिक्षण संस्था पुढे चालवत आहे, असे सांगण्यात आले.

विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू म्हणाले, शिक्षणाचा खरा अर्थ चांगल्या मूल्यांची प्रतिष्ठापना करणे हा आहे. ही मूल्ये व्यक्तिगत व सामाजिक जीवनात पोषकद्रव्यासारखी काम करतात. यावेळी त्यांनी तु. ह. वाजेकर यांचे जीवनकार्य सांगितले व रयत शिक्षण संस्थेच्या फुंडे विद्यालयाच्या उभारणीतील त्यांचे योगदान स्पष्ट केले. इयत्ता ८ वी अ च्या विद्यार्थ्यांनी उपशिक्षिका एस. एस. म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली सुंदर नियोजन केले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गायत्री पोटे, श्रावणी तेलंगे यांनी, तर रुद्रा धुमाळ हिने आभार मानले.

# बुरखाधारी महिलांनी ज्वेलर्समधून लांबवली बांगडी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील कल्याण ज्वेलर्सच्या स्टोअरमधून दोन बुरखाधारी अनोळखी



महिलांनी संगनमताने सोन्याची बांगडी चोरून नेल्याची घटना घडली. याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दोन बुरखाधारी महिला कल्याण ज्वेलर्समध्ये सोन्याची बांगडी खरेदी करण्याच्या बहाण्याने आल्या.

त्यांनी स्टोअरमधील सेल्समनचे लक्ष विचलित करून संधी साधत २१.०४ ग्रॅम वजनाची अंदाजे एक लाख १० हजार रुपये किमतीची प्लेन सोन्याची बांगडी लबाडीच्या इराद्याने चोरून नेली. घटनेची माहिती मिळाल्यानंतर फिर्यादी चंदनसिंग किशोरसिंग राठोड यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी दोन बुरखाधारी अनोळखी महिलांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांचा शोध सुरू आहे.

# नानोशी परिसरात भूकंपाचे सौम्य धक्के; सुदैवाने हानी नाही

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील मौजे नानोशी गाव परिसरात २.६ रिश्टर स्केल तीव्रतेच्या भूकंपाची नोंद झाली. भूकंपाची माहिती मिळताच महसूल प्रशासनाने नानोशी व लगतच्या परिसरात तातडीने पाहणी केली. नानोशी येथील तलाठ्यांनी प्रत्यक्ष गावात जाऊन पाहणी केली असता भूकंपाची नोंद भूकंपमापन केंद्रावर झाली असली तरी ग्रामस्थांना कोणतेही धक्के जाणवले नसल्याचे आढळून आले.

परिसरात कोणतीही जीवितहानी, वित्तहानी किंवा पडझड झाल्याची नोंद नाही. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सूचनेनुसार स्थानिक प्रशासनाने आवश्यक खबरदारी घेतली असून सध्या परिस्थिती पूर्णपणे सामान्य आहे. हा अत्यंत सौम्य स्वरूपाचा धक्का असल्याने नागरिकांनी घाबरून जाऊ नये तसेच सोशल मीडियावर पसरवल्या जाणाऱ्या अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन महसूल प्रशासनाने केले आहे.

# ९२ हजारांचा हुक्का साठा जप्त

**पनवेल : वार्ताहर**

खारघर सेक्टर ४ येथील भूमी टॉवरमधील द स्मोक शॉप दुकानावर अमली पदार्थविरोधी पथकाने छापा टाकून सुमारे ९२ हजार रुपये किमतीचा हुक्का



फ्लेवर आणि हुक्का सेवनासाठी वापरण्यात येणारे विविध साहित्य जप्त केले. हे दुकान आयटीएम महाविद्यालयापासून अवघ्या ५० मीटर अंतरावर असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

खारघर परिसरात प्रतिबंधित हुक्का फ्लेवर तसेच हुक्का सेवनासाठी लागणारे तंबाखूजन्य साहित्य ग्राहकांना विकले जात असल्याची गोपनीय माहिती अमली पदार्थविरोधी पथकाला मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने संबंधित दुकानावर छापा टाकला. पोलिसांनी दुकानाची झडती घेतली असता विविध कंपन्यांचे तंबाखूजन्य हुक्का फ्लेवरचे डबे, हुक्का पॉट आणि हुक्का पाइप आढळून आले.

पोलिसांनी विविध कंपन्यांचे हुक्का फ्लेवरचे डबे, सहा हुक्का पॉट आणि चार हुक्का पाइप असा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी दुकानमालक मोहम्मद ताजुद्दीन अब्दुल्ला (२२) याच्याविरुद्ध खारघर पोलीस ठाण्यात संबंधित कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला ताब्यात घेण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

# गृहकर्जाच्या नावाखाली कोट्यवधींची फसवणूक

**पनवेल** : गृहकर्ज मंजूर करून स्वतःच्या खात्यात स्वीकारल्याप्रकरणी तसेच बनावट कागदपत्रे तयार करून सदनिका क्रेडिट सोसायटीकडे गहाण ठेवल्याप्रकरणी विनोद खंडू डुंबरे (रा. सीता विष्णू सोसायटी, सेक्टर १९, कोपरखैरणे) याच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बळीराम पाटील हे विचुंबे येथे राहत असून आरोपी विनोद डुंबरेने तो सदनिका विक्री एजंट असल्याचे सांगितले. ओमकार रेसिडेन्सी, नेरेपाडा येथील प्रकल्पातील सदनिका विक्रीसाठी खरेदीदार शोधून देतो व बँकेकडून गृहकर्ज मंजूर करून घेतो, असे सांगितले. मंजूर झालेली गृहकर्जाची रक्कम स्वतःकडे पाठवण्यास सांगून १२ सदनिकांचे प्रति सदनिका सव्वा लाख रुपये प्रतिमहिना असे एकूण २० महिने देतो, असे सांगून त्यांच्यासोबत समझोता करारनामा केला.

कराराप्रमाणे आरोपीने सांगली वैभव को-ऑपरेटिव्ह सोसायटीमध्ये बळीराम पाटील यांच्या आठ सदनिकांचे गृहकर्ज मंजूर करून एकूण एक कोटी ९७ लाख रुपये स्वतःच्या सानपाडा येथील बँक खात्यात स्वीकारले. तसेच बळीराम पाटील यांच्या ओमकार एंटरप्रायजेसच्या नावाने बनावट कागदपत्रे तयार केली आणि तोच ओमकार एंटरप्रायजेस बिल्डर अँड डेव्हलपर्सचा प्रोप्रायटर असल्याचे भासवून सांगली वैभव सोसायटीकडे सदनिका गहाण ठेवल्या.

# मोहोदरमध्ये महिलांना विमा प्रमाणपत्रांचे वाटप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल पंचायत समितीच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत वावंजे जिल्हा परिषद गटातील मोहोदर गावात महिलांसाठी विमा संरक्षण वाटप करण्यात आले. भाजप नेते एकनाथ देशेकर यांच्या वाढदिवसानिमित्त हा विमा काढण्यात आला होता. आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल पंचायत समितीच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत.

त्याचाच एक भाग म्हणून वावंजे जिल्हा परिषद गटातील मोहोदर गावात महिलांना विमा संरक्षणाचा लाभ देण्यात आला. भाजप नेते एकनाथ देशेकर यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद गटातील २०० महिलांचा प्रत्येकी दोन लाख रुपयांचा विमा श्रीराम फायनान्सच्या माध्यमातून काढण्यात आला आहे. यापैकी मोहोदर गावातील २२ महिलांना विमा प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर आणि उपसभापती भूपेंद्र पाटील यांच्या हस्ते कार्यक्रम पार पडला. यावेळी जिल्हा परिषद सदस्या कमलाताई देशेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाला भाजप नेते सदाशिव वास्कर, सचिन पाटील, पंचायत समितीचे अभियंता अभिजीत मटकर, संजय भास्कर, भानुदास भगत, कैलास भगत, राजेश पाटील, अभिमन्यू भगत, भरत गोंधळी आदी उपस्थित होते.

# खंडणीप्रकरणी गुन्हा दाखल

**नवीन पनवेल** : जबरदस्तीने पैशांची मागणी करून पैसे दिले नाहीत तर ट्रॅव्हल्स पुढे सोडणार नाही, असे बोलून तीन हजार रुपये मोबाइल क्रमांकावर स्वीकारल्याप्रकरणी दोघांविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी माजी अब्दुल वाहिद शेलिया (रा. वसई पश्चिम) यांची ट्रॅव्हल्स प्रवासी उतरण्याकरिता मुंबई-पुणे हायवेवर कळंबोली मॅकडोनल्डच्या समोर थांबली होती. आरोपी महेश देवकर आणि ऋषी घोरपडे हे त्यांच्या ट्रॅव्हल्सजवळ आले आणि त्यांनी ट्रॅव्हल्समधील दोन्ही चालक, शिपाई आणि कडीवाल यांना बाहेर बोलावले व मारहाण केली. यावेळी घटनेचे व्हिडीओ रेकॉर्डिंग करीत असलेल्या प्रवाशाला ट्रॅव्हल्समधून बाहेर घेऊन मारहाण केली. त्यांच्याकडे तीन हजार रुपयांची मागणी करून ती रक्कम दिली नाही तर ट्रॅव्हल्स पुढे सोडणार नाही, असे सांगितले.

# गांधी जयंतीला विश्वशांती ग्रुपकडून स्वच्छता अभियान

**पनवेल : वार्ताहर**

समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो, या भावनेतून वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या विश्वशांती ग्रुपने गांधी जयंतीनिमित्त सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता अभियान राबवून सामाजिक बांधिलकी जपली. पनवेलमधील विविध क्षेत्रांत कार्यरत असलेले मित्र विश्वशांती ग्रुपच्या माध्यमातून एकत्र येऊन समाजोपयोगी उपक्रम राबवत असतात. गरजू व्यक्तींना मदत करणे, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करणे यासह विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून ग्रुपकडून सामाजिक योगदान दिले जाते. महात्मा गांधी जयंतीनिमित्त सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखण्याचा संदेश देत ग्रुपच्या सदस्यांनी स्वच्छता अभियान राबविले.

या उपक्रमातून नागरिकांनीही स्वच्छतेबाबत जागरूक राहावे, असा संदेश देण्यात आला. या अभियानात संस्थापक प्रशांत शेडगे, अध्यक्ष दयानंद धुरी, उपाध्यक्ष बालकृष्ण पुजारी, चिटणीस भूषण आंग्रे, सहचिटणीस सिद्धेश खानविलकर, खजिनदार चेतन शहा तसेच सदस्य शैलेश पोटे, रोहित चांडोक, रुपेश शेट्ये, सुमित वासंती यांच्यासह इतर सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. उपक्रमाचे नागरिकांकडून कौतुक करण्यात आले.



# नवीन पनवेलमधून महिला बेपत्ता

**पनवेल** : नवीन पनवेल सेक्टर ८ येथून २९ वर्षीय प्रेमकला लोहार ही महिला बेपत्ता झाल्याची नोंद खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. पोलिसांनी तिचा शोध सुरू केला असून नागरिकांना माहिती मिळाल्यास पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. प्रेमकला श्रीजी कॉर्नर सोसायटी, प्लॉट क्रमांक ३९, ४०, ४१, सेक्टर ८, नवीन पनवेल येथील घरातून घरकामाला जाते, असे सांगून बाहेर पडली. मात्र त्यानंतर ती घरी परतली नाही. शोध घेऊनही ठावठिकाणा लागला नसल्याने पोलिसांत खबर देण्यात आली. रंग गोरा, उंची ५ फूट ५ इंच, केस काळे व लांब, डोळे काळे आणि बांधा मध्यम आहे. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून पोलीस हवालदार पूनम पाटील अधिक तपास करीत आहेत.

# समुद्र किनारी लाईफगार्ड वाढवण्याचे मंत्री गिरीश महाजन यांचे आदेश

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

दिवेआगर समुद्रकिनाऱ्यावर गुरुवारी सहलीला आलेल्या आठ विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाल्याची घटना घडल्या नंतर राज्याचे आपत्ती निवारण मंत्री गिरीश महाजन यांनीच या घटनेचे गांभिर्य विचारात घेवून तत्काळ रायगडचे जिल्हाधिकारी किसन जावळे यांना या घटनेस जबाबदार असलेल्यावर कारवाई करण्याचे आदेश दिल्यावर रायगड जिल्हा प्रशासन खडबडून जागे झाले.

जिल्ह्यातील सर्व समुद्र किनाऱ्यांवर सुरक्षात्मक उपाययोजना करण्याकरिता संबंधीत समुद्र किनारा ज्या ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात येतो ती ग्रामपंचायत, जिल्ह्याची



आपत्ती निवारण यंत्रणा आणि स्थानिक पोलिस यांच्या माध्यमातून लाईफगार्डची नियूक्ती करण्यात येणार आहे. दरम्यान, समुद्र किनाऱ्यांवर पुर्वीपासून पोलीस चौक्या आहेत.त्यातील पोलिस आणि स्थानिक जिवरक्षक यांनी या पूर्वीही आपत्कालीन परिस्थितीत बुडणाऱ्या पर्यटकांना वाचवण्याचे काम केले असल्याची माहिती रायगड जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

शुक्रवारी आळंदी येथे अंत्यसंस्कार पार पडल्यानंतर आता पोलीस तपासाचा पुढील टप्पा सुरू झाला आहे.अधिकारी नातेवाकांची भेट घेऊन त्यांचे अधिकृत जबाब नोंदवतील. या दुर्घटनेला नातेवाईकांनी कोणाला जबाबदार धरले आहे किंवा यात कोणाचा निष्काळजीपणा समोर आला आहे, हे या जबाबांवरून स्पष्ट होईल. नातेवाईकांच्या तक्रारी व जबाबाच्या आधारे पुढील कायदेशीर कारवाई व पोलीस तपासाची दिशा निश्चित केली जाईल, असे रायगड जिल्ह्याचे अप्पर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे यांनी स्पष्ट केले आहे.

दरम्यान, आपत्ती निवारण मंत्री गिरीश महाजन यांनी रायगडचे जिल्हाधिकारी किसन जावळे यांच्याशी फोन वरुन संपर्क करुन या घटनेस विद्यार्थीची सहल घेवून येणारे शिक्षक जबाबदार आहेत का या अनुषंगाने तपास करण्यास सांगितले होते. त्यानुसार जिल्हाधिकारी जावळे यांनी रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांना या बाबत निर्देश दिले होते.

यानुसार गुरुवारी रात्री सहलीबरोबर आलेल्या एका शिक्षकाला थांबवून पोलिसांनी चौकशी करुन जबाबा घेतला असल्याची माहिती रायगड जिल्हा आपत्ती निवारण प्रधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा रायगडचे निवासी उप जिल्हाधिकारी संदेश शिर्के यांनी दिली आहे.

# पालीत गढूळ, अशुद्ध पाण्याचा पुरवठा; नागरिकांसह भाविकांचे आरोग्य धोक्यात

**पाली : प्रतिनिधी**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र पाली शहराला अशुद्‌ध व गढूळ पाण्याचा पुरवठा होत असून शुद्‌ध पाणीपुरवठा योजनेची प्रतीक्षा कायम आहे. पाऊस थांबल्याने अंबा नदीचे पाणी प्रचंड गढूळ झाले आहे. पालीकरांना थेट अंबा नदीतून कोणतीही शुद्‌धीकरण प्रक्रिया न करता पाणी पुरवले जाते. नदीत सोडण्यात येणारे सांडपाणी, कंपन्यांचे प्रदूषित पाणी, कचरा आणि वाळू उपसामुळे पाणी दूषित झाले असून नागरिक व जीवसृष्टीचे आरोग्य धोक्यात आले आहे.

सध्या येणारे पाणी इतके गढूळ आहे की त्यातून अंघोळ काय तर कपडे व भांडी सुद्धा घासले जाऊ शकत नाही. पिण्यासाठी वापरणे तर दुरूच. वितरित होणाऱ्या पाण्यावर क्लोरीनेशन किंवा कोणतीही प्रक्रिया होत नसल्याने कित्येक वर्षे नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू आहे. हजारो नागरिक आणि दररोज येणारे हजारो भाविक यांना नाईलाजाने हेच दूषित पाणी





वापरावे लागते. नळांतून अनेकदा जिवंत साप, खुबे, शिंपले, मासे, किडे, तसेच गाळ आणि शेवाळ बाहेर येण्याचे प्रकार घडत आहेत.

१९७४ मध्ये मंजुरी मिळालेल्या या योजनेचा खर्च आता २५ कोटींवर पोहोचला आहे. २००८–०९ च्या सर्व्हेनुसार ७ कोटी ७९ लाखांच्या निधीतून ही योजना आखली होती. पुढे 'क' दर्जा तीर्थक्षेत्रामुळे १० टक्के लोकवर्गणीची अट शिथिल झाली. २०२२ मध्ये नगरपंचायतीची स्थापना झाल्यानंतर २५ कोटींचा नवा प्रस्ताव पाठवण्यात आला आहे.

**शुद्‌ध पाणीपुरवठा योजनेची फाईल मंजुरीसाठी नगर विकास विभागात आहे. तिथे मान्यता मिळाल्यावर पुढे मंजुरीची प्रक्रिया होईल. महाराष्ट्रातील अनेक शुद्‌ध पाणीपुरवठा योजना मंजुरीच्या प्रतीक्षेत आहेत. पाली शुद्‌ध पाणीपुरवठा योजना मंजुरी व इतर विकास कामासंदर्भात मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे. शुद्‌ध पाणी योजना कार्यान्वित होण्यासाठी पाठपुरावा सुरू आहे.**

**–सुलतान बेनसेकर,**
**उपनगराध्यक्ष पाली नगरपंचायत**

# खालापूरमध्ये सुगंधित पान मसाला, तंबाखू जप्त; दोघांविरुद्ध गुन्हा

**मोहोपाडा, खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

खालापूर पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंगदरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने धडक कारवाई करत महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला सुगंधित विमल पान मसाला व सुगंधी तंबाखू असा एकूण १ लाख ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.ही कारवाई दि. ३ ऑक्टोबर रोजी करण्यात आली. या प्रकरणी खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी मनोज कुमार जगत दास (वय १९, रा. नुरानी, मुल्ला हाळ बुद्रुक, ता. खालापूर,



जि. रायगड) आणि मोहम्मद बिलाल मोहम्मद कासिम (वय २१, रा. नुरानी, मुल्ला हाळ बुद्रुक, ता. खालापूर, जि. रायगड) यांच्याविरुद्‌ध कारवाई करण्यात आली आहे.स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक मानसिंग पाटील, सहायक फौजदार संदीप पाटील, पोलीस हवालदार रवींद्र मुंडे, प्रतीक सावंत, शरद फरांदे, रणजितसिंह खराडे, मनोहर सिरतार तसेच पोलीस कॉन्स्टेबल प्रदीप खरात यांच्या पथकाने ही कारवाई केली.पेट्रोलिंग सुरू असताना पोलीस हवालदार रणजितसिंह खराडे यांना मिळालेल्या माहितीच्या आधारे छापा टाकण्यात आला.

# मुरूड नगरीत रायगड सुरक्षा चषक २०२६चा थरार

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड नगरीतील परेश नाका परिसरातील समुद्रकिनारी रायगड जिल्हा पोलिसांच्या वतीने रायगड सुरक्षा चषक २०२६ कबड्डी साखळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सागरी सुरक्षा दलातील जवान आणि मच्छीमार बांधवांमध्ये सागरी सुरक्षेबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या मुख्य उद्देशाने या बीच कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

रायगड जिल्हा पोलिस अधीक्षक आंचल दलाल यांच्या संकल्पनेतून तसेच मुरूड, तळा आणि रोहा या सागरी पोलिस ठाण्यांच्या माध्यमातून ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेचे आयोजन मुरूड पोलिस ठाण्याच्या वतीने



करण्यात आले असून, पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा पार पडत आहे.

या स्पर्धेत महिला गटात मुरूड आणि रोहा संघ सहभागी झाले असून, पुरुष गटात मुरूड, रोहा आणि तळा या तीन संघांमध्ये चुरशीचे सामने रंगणार आहेत. स्पर्धेचा अंतिम सामना १० ऑक्टोबर रोजी अलिबाग येथे होणार आहे.

स्पर्धेतील विजेत्या संघाला ५१ हजार रुपये, उपविजेत्या संघाला ३१ हजार रुपये, तर तृतीय क्रमांकाच्या संघाला २१ हजार रुपये रोख पारितोषिक व चषक देण्यात येणार आहे.

स्पर्धेचा शुभारंभ कोस्ट गार्ड अधिकारी अभिषेक करुणाकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आला. यावेळी श्रीगणेशाचे पूजन करण्यात आले. पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यात आले. त्यानंतर श्रीफळ वाढवून सामन्याचे उद्‌घाटन करण्यात आले. उपस्थित सर्व खेळाडूंना सागरी सुरक्षा आणि क्रीडा शिस्तीची शपथ देण्यात आली.

स्पर्धेसाठी पंच म्हणून अमोल नलावडे आणि नितीन समजीसकर यांनी जबाबदारी सांभाळली. पंचायत समितीच्या उपसभापती अश्विनी जंगम यांच्या हस्ते नाणेफेक करण्यात आली.

यावेळी पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे, उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत, नगरसेवक पांडुरंग आरेकर, आदेश दांडेकर, बाळकृष्ण कासार, माजी नगरसेवक प्रमोद भायदे, ताबीश ढाकम, श्रीकांत सुर्वे, पोलिस मकरंद पाटील, पोलिस नाईक किशोर बठारे, रायगड जिल्हा पोलिस क्रीडा प्रमुख ऋषिकेश साखरकर, कोस्ट गार्ड अधिकारी अभिषेक करुणाकर, नगरसेवक मनिष माळी, श्रीकांत खोत, निवृत्त पोलिस उपनिरीक्षक दीपक राऊळ, विश्वनाथ पाटील, भरत बेलोसे, मनोहर मकु, अरुण मढवी, मनिष नांदगावकर, राष्ट्रीय खेळाडू संजय मोकळ, मारुती म्हात्रे, पंचायत समिती उपसभापती अश्विनी जंगम यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

समुद्रकिनारी रंगणाऱ्या या अनोख्या कबड्डी स्पर्धेमुळे क्रीडा क्षेत्राला चालना मिळण्याबरोबरच सागरी सुरक्षा, मच्छीमार बांधव आणि सुरक्षा यंत्रणांमधील समन्वयाबाबत जनजागृती होण्यास मदत होत आहे. त्यामुळे 'रायगड सुरक्षा चषक २०२६' हा उपक्रम क्रीडा आणि सागरी सुरक्षा जनजागृतीचा अनोखा संगम ठरत आहे.

# सेवा संकल्प अभियान स्पर्धेत नाडसूरच्या विद्यार्थ्यांची दमदार कामगिरी

**पाली : प्रतिनिधी**

पंचायत समिती शिक्षण विभाग सुधागड पाली आयोजित 'सेवा संकल्प अभियान २०२६–२७' अंतर्गत केंद्रस्तरीय वक्तृत्व व चित्रकला स्पर्धा केंद्र शाळा नाडसूर येथे अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडल्या. "विकसित भारत २०४७" या मुख्य विषयावर आधारित या स्पर्धांमध्ये नाडसूर केंद्रातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपल्या वक्तृत्वकौशल्याचे आणि सर्जनशीलतेचे प्रभावी प्रदर्शन केले.



स्पर्धेच्या वक्तृत्व स्पर्धेत ३ री ते ५ वी गटात पल्लवी प्रशांत साळुंखे हिने प्रथम, कृतिका राजेश ठाकूर हिने द्वितीय, तर किशोरी दत्ता ठोंबरे हिने तृतीय क्रमांक पटकावला. ६ वी ते ८ वी गटात दुर्वा धोंडू कोकरे प्रथम, आरोही जांभुळकर द्वितीय आणि वृषाली वाक तृतीय आली. ९ वी ते १२ वी गटात कटरिना तुकाराम शिंदे हिने प्रथम, तर रतनदीप वनदीप जाधव याने द्वितीय क्रमांक मिळविला. चित्रकला स्पर्धेत ३ री ते ५ वी गटात वैदेही पायगुडे प्रथम, किशोरी दत्ता ठोंबरे द्वितीय आणि आराधना संजय पवार तृतीय आली. ६ वी ते ८ वी गटात तेजस्वी महेश जांभुळकर हिने प्रथम, तर प्रेम तुकाराम शिंदे याने द्वितीय क्रमांक मिळविला. ९ वी ते १२ वी गटात वैष्णवी विशाल पायगुडे प्रथम, तर मीना अर्जुन सरकार हिने द्वितीय क्रमांक पटकावला.

नाडसूर केंद्राचे केंद्रप्रमुख अमोल पाटील यांच्या हस्ते सर्व विजेत्या स्पर्धकांना प्रमाणपत्र व खाऊ देऊन सन्मानित करण्यात आले. या यशस्वी विद्यार्थ्यांचे माननीय सभापती, उपसभापती, सरपंच, उपसरपंच, पंचायत समिती सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सदस्य, शिक्षक, पालक तसेच शिक्षणप्रेमींकडून विशेष अभिनंदन करण्यात आले असून पुढील तालुकास्तरीय स्पर्धेसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

कार्यक्रमादरम्यान मनोगत व्यक्त करताना केंद्रप्रमुख अमोल पाटील म्हणाले की, सुधागड पाली पंचायत समिती शिक्षण विभागाचे गटशिक्षणाधिकारी सादुराम बांगारे आणि वरिष्ठ विस्तार अधिकारी नवनाथ साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली नाडसूर केंद्र 'निपुण' होण्याच्या दृष्टीने यशस्वी वाटचाल करत आहे आणि वरिष्ठांच्या प्रेरणेमुळे केंद्रातील वातावरण नेहमीच उत्साही व प्रफुल्लित असते. याप्रसंगी रायगड जिल्हा परिषद शाळा आसानवाडीचे मुख्याध्यापक गोरख आघाव यांनी सांगितले की, सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना मोठा वाव मिळत असून अशा केंद्रस्तरीय स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांना आपले कलागुण मांडण्यासाठी खुले व्यासपीठ मिळते व त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होतो.

# चौल गायचोळे स्मशानभूमी रस्त्याचे भूमिपूजन

**रेवदंडा : प्रतिनिधी**

आमदार महेंद्र दळवी यांच्या माध्यमातून मंजूर झालेल्या एमएमआरडीए अंतर्गत चौलगायचोळे स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कामाचा शुभारंभ उत्साहात करण्यात आला. जिल्हा परिषद सदस्य डॉ. सचिन दादा राऊळ आणि पंचायत समिती सदस्या अंकिता घरत यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून कामाची सुरुवात करण्यात आली.

चौलगायचोळे स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था झाल्याने ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर रस्त्याच्या कामाला मंजुरी मिळाल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. या रस्त्यामुळे परिसरातील नागरिकांची वाहतूक तसेच स्मशानभूमीकडे जाण्या–येण्याची गैरसोय दूर होण्यास मदत होणार आहे.

यावेळी चौल शिवसेना शाखाप्रमुख तथा चौल पंचायत समिती गणप्रमुख सिद्‌धेश शेणवईकर, उद्योजक सुदेशशेठ राऊळ, आशिष कंटक, शिवसैनिक तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.



# म्हसळ्यात भरवस्तीत आली मगर!



**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळ्यातील घोणसे म्हशाचे वाडीत पहाटेच मानवी वस्तीत मगर आली. वन विभाग, स्थानिक ग्रामस्थांच्या तत्परतेमुळे या मगरीला सुरक्षितपणे जाळ्यात पकडून नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले.

गेले दोन दिवस हवामानांतील उष्णतामान वाढले आहे. वाढत्या उष्णतेमुळे त्रस्त झालेली आणि पाण्याच्या शोधात भटकणारी एक मगर थेट मानवी वस्तीजवळ भूपृष्ठावर आल्याचे पाहायला मिळाले.

म्हसळा विभागाचे वनरक्षक अतुल अहिरे यांनी आमच्या प्रतिनिधीला दिलेल्या माहितीनुसार घोणसे येथे सुरक्षितपणे रेस्क्यू केलेली ही मगर नैसर्गिक अधिवासात उत्तमरीत्या वाढलेली अत्यंत सुदृढ आणि सुमारे चार फूट लांबीची होती. तिला नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले.

# मुरूडच्या पिकलेल्या शेतात बुजगावण्याला मिळाला मानवी चेहरा

**मुरुड : रामप्रहर वृत्त**

रायगडात ऑक्टोबरच्या कडक उन्हाची सुरवात झाली. भात पिकण्यासाठी या कडक उन्हाची गरज असते. सर्वत्र शेतात भात पिकून तयार असल्याने पिकावर पक्षी प्राणी त्रास देऊ नये म्हणून मातीच्या मडक्याला माणसाचे कपडे घालून शेतात बुजगावणं उभा करता, परंतु नव्या युगात मातीच्या मड्क्याची जागा मानवी चेहऱ्याने घेतला आहे.

शेतकऱ्याची कल्पकता किती सुंदर आहे .पक्षी बुजगावण्याला घाबरत नाही हे पाहून प्रत्यक्षात माणूसच साकारला .बुजगावण्याला पाहून पर्यटक थक्क होतायत .शेतात थांबून बुजगावण्यासोबत फोटो काढून आनंद घेत आहेत

रायगडचा शेतकरी आधीच कामगारांची मजुरी जास्त असल्याने शेतात भात लावण्यास तयार नसतो .त्यात अवेळी पाऊस व वादळी वारा हात बोटाशी आलेलं पीक हिरावून घेते ,यातूनच काही होतकरू शेतकरी भात शेती करतात ते आपली शेती वाचवण्यासाठी आपल्या शेतात बुजगावणं वापरून पक्षापासून आपले धन वाचवटण्याचा प्रयत्न करतो .

बुजगावण्याबाबत दोन मतप्रवाह आहेत. काही पक्षी प्रेमी म्हणतात शेतात पिकलेल्या धान्यापैकी १० टक्के धान्य पक्षी खातात .परंतु ते खाताना पक्षांची होणारी किलबिल व तयार होणारे सुमधुर संगीतामुळे शेतीचे उत्पादन वाढते असे विज्ञानाने साबित केले आहे मग वाढलेल्या उत्पादनातील थोडा भाग पक्षांनी झाला तर काय झालं



दुसरा प्रवाह म्हणतो रायगडच्या वातावरणात पाऊसाचा अनियमितपणा व पिकणारे धान्य यातून शेतकऱ्याच्या हाती काहीही लागत नाही ,त्याचे नुकसान वाचवण्यासाठी बुजगावणे गरजेचे आहे .असो नफा तोट्याचा विचार सोडला तर बुजगावण्याची नवीन आवृत्ती पर्यटकांच्या पसंती पडली आहे.



# भारताची ऑस्ट्रेलियावर मात

## लेजेंड्स चॅम्पियनशिपमध्ये युवराजचा धडाका





**शारजा : वृत्तसंस्था**

आशियाई क्रिकेट स्पर्धेत पाकिस्तानविरुद्धच्या अंतिम सामन्यात षटकारांची बरसात करून युवा सलामीवीर अभिषेक शर्माने धुव्वा उडवला, तर दुसरीकडे चॅम्पियन्स लीगमध्ये अनुभवी अष्टपैलू खेळाडू आणि भारतीय टीमचा कर्णधार युवराज सिंग याने आपल्या फलंदाजीने पुनरागमन केले. गुरू शिष्याच्या जोडीचा भारतासाठी खेळ भारतीय क्रिकेटप्रेमींसाठी पर्वणी ठरली.

भारताने ऑस्ट्रेलियाला धूळ चारत विश्वचषक स्पर्धेत दिमाखदार सुरुवात केली. चॅम्पिअन्स लीगच्या या सामन्यामध्ये जुन्या खेळाडूंची ताकद पुन्हा एकदा सिद्ध झाली. वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लेजेंड्सच्या पहिल्या सामन्यात भारताने ४६ धावांनी ऑस्ट्रेलियाचा पराभव केला.

शारजा क्रिकेट स्टेडिअमवर रंगलेल्या या सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी करत २० ओव्हर्समध्ये १९६ धावांचे ध्येय ऑस्ट्रलिया संघासमोर ठेवले होते. या धावांचा सामना करताना ऑस्ट्रेलिया टीम मात्र १६.२ षटकांतच १५० धावा करताना गार झाली. या सामन्यात भारताची फलंदाजी आणि गोलंदाजी दोन्हीही उत्तम ठरले.

युवराजने आपल्या शानदार, धडाकेबाज खेळाची झलक दाखवली. त्याने ४४ चेंडूंमध्ये ७१ धावांची कामगिरी केली. १६१.३६च्या स्ट्राईक रेटने फलंदाजी करत त्याने चार चौकार आणि पाच षटकार मारले. त्याच्या उत्कृष्ट अशा फलंदाजीने टीमला एका भक्कम धावसंख्येपर्यंत पोहचवले.

# महात्मा फुले महाविद्यालयाची क्रॉस कंट्री स्पर्धेत चमकदार कामगिरी

**पनवेल : प्रतिनिधी**



रयत शिक्षण संस्थेच्या पनवेल येथील महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाने मुंबई विद्यापीठ आयोजित मुंबई झोन क्र. १च्या क्रॉस कंट्री स्पर्धेत सुवर्णपदकाची कमाई केली. ही स्पर्धा कळंबोली येथील केएलई महाविद्यालय येथे २ ऑक्टोबर रोजी झाली.

स्पर्धेत मुलींच्या संघाने सुवर्ण चॅम्पियनशिप मिळविली. या संघामध्ये शिवकन्या मोहन ताटे, करिना अनिकेत पवार, आचल शेळके, दिया समाधान कोळी या विद्यार्थिनींचा समावेश होता, तर मुलांच्या संघाने रौप्य चॅम्पियनशिप मिळवली. या संघामध्ये राज कमल्या भगत, साहिल श्रीकांत साळुंखे, विभव घरत, सत्यम ठाकूर आणि तन्मय सावंत या विद्यार्थ्यांचा समावेश होता.

साहिल साळुंखे याने मुलांच्या गटात वैयक्तिक रौप्यपदकही प्राप्त केले. दरम्यान, शिवकन्या ताटे, साहिल साळुंखे आणि राज भगत या तीन विद्यार्थ्यांची मुंबई विद्यापीठाच्या विभागीय संघात निवड झाली.

या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, उपप्राचार्य डॉ. सोनू लांडे, डॉ. लक्ष्मण गवळी, उपप्राचार्य व आयक्यूएसी समन्वयक डॉ. सोपान गोवे, जिमखाना कमिटीचे चेअरमन डॉ. प्रफुल्ल वशेणीकर, ग्रंथपाल सुनील अवचिते, प्रा. प्रवीण गायकर, एनसीसी प्रमुख प्रा. रामदास जमनुके, डॉ. यशवंत उलवेकर, जिमखाना कमिटीतील डॉ.लीना मेश्राम, डॉ. रूपश्री कडू, प्रा. अतुल पोखरकर, प्रा.मयूर पाटील, प्रा.नयन कोळी यांनी मार्गदर्शन केले.




# आंतरशालेय कबड्डी स्पर्धेत रोहा संघ विजेता

**धाटाव : प्रतिनिधी**

उरण येथे आयोजित सीबीएसई आंतरशालेय कबड्डी स्पर्धा २०२६मध्ये ग्रेगोरियन पब्लिक स्कूल, रोहा यांच्या मुलांच्या कबड्डी संघाने दमदार खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला.

अंतिम सामना तर श्वास रोखून धरायला लावणारा ठरला. दोन्ही संघांनी निर्धारित वेळेत दोन्ही संघांची गुणसंख्या समान राहिल्याने सामना टाय झाला. त्यानंतर ५-५ निर्णायक रेडमध्ये ग्रेगोरियन पब्लिक स्कूल संघाने संयम, आत्मविश्वास आणि अचूक डावपेच दाखवत बाजी मारली. संघाला प्रशिक्षक सुधीर जंगम यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल खेळाडू, प्रशिक्षक यांचे प्राचार्य एलेन फादर यांनी अभिनंदन केले.

# 'सीकेटी'च्या गौरीला तायक्वांदो स्पर्धेत सुवर्णपदक; वृषभला 'कांस्य'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक संचालनालय अंतर्गत ठाणे जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने वसई येथे आयोजित मुंबई विभागीय शालेय तायक्वांदो स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील गौरी कोळी (इ.१२वी) हिने सुवर्णपदक मिळवले.





याबद्दल गौरीची राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्याचप्रमाणे वृषभ कावळे (इ.११वी) याने तायक्वांदो स्पर्धेत कांस्यपदक प्राप्त केले आहे. या दोन्ही क्रीडापटूंचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे व स्वाती पाटील, क्रीडा शिक्षक अरुण पाटील, मनोज पाटील, माधवी कोळी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# रेवदंडा चौपाटीवर रंगली पोलीस कबड्डी स्पर्धा

**रेवदंडा : प्रतिनिधी**



रायगड जिल्हा पोलीस सागरी सुरक्षा चषक २०२६ कबड्डी स्पर्धेतील साखळी सामने रेवदंडा समुद्र चौपाटीवर खेळविण्यात आले. यामध्ये अलिबाग, पोयनाड, रेवदंडा आणि नागोठणे पोलीस ठाणे अंतर्गत सागरी सुरक्षा दल संघाचे सामने रंगले.

सागरी सुरक्षा चषक कबड्डी स्पर्धा सलग दुसऱ्यांदा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचा शुभारंभ मांडवा २ ऑक्टोबर रोजी झाला, तर ३ रोजी स्पर्धेतील महिला व पुरूष गटातील कबड्डी साखळी सामने रेवदंडा चौपाटी येथे झाले.

रेवदंडा येथे रायगड जिल्हा पोलिसांच्या वतीने अप्पर अधीक्षक अभिजीत शिवथरे यांच्या हस्ते साखळी कबड्डी स्पर्धेचा शुभारंभ झाला. यावेळी रायगड जिल्हा सुरक्षा शाखा पोलीस निरीक्षक संदीप बागुल, नागोठणे सहाय्यक निरीक्षक राजेंद्र पाखरे, रेवदंडा पोलीस ठाणे इन्चार्ज सहाय्यक निरीक्षक सुजित गडदे, डॉ. आशिष धरणकर, डॉ. अमित पठारे, सुरेंद्र म्हात्रे, सरपंच प्रफुल्ल मोरे, उपसरपंच संतोष मोरे, माजी ग्रामपंचायत सदस्य संदीप खोत, महिला दक्षता समिती सदस्य शलका राऊत, तनुजा मोरे, भूषण मोरे, राजू चुनेकर, शरद खंडेराव, रायगड पोलीस स्पोर्ट्स इन्चार्ज ऋषिकेश साखरकर आदी उपस्थिती होते.

स्पर्धेचे समालोचन माजी पोलीस विश्वनाथ पाटील व रेवदंडा पोलीस ठाण्याचे मनीष ठाकूर यांनी केले. उर्वरित साखळी सामने ८ ऑक्टोबर रोजी होतील. साखळी सामन्यातून गुणात्मक पद्धतीने गटविजेते ठरणाऱ्या चार संघात अंतिम लढत १० ऑक्टोबरला अलिबाग समुद्र किनारी होणार आहे.

# नियती देसाई हॅमर थ्रोमध्ये रायगड जिल्ह्यात अव्वल

**माणगाव : प्रतिनिधी**

मेहनत, जिद्द आणि आत्मविश्वासाच्या जोरावर माणगावच्या अशोकदादा साबळे विद्यालय व ज्युनिअर कॉलेजमधील इयत्ता बारावी विज्ञान शाखेची विद्यार्थिनी नियती सचिन देसाई हिने जिल्हास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेत हॅमर थ्रोमध्ये १९.५० मीटरची भक्कम कामगिरी करत रायगड जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. या उल्लेखनीय कामगिरीमुळे तिची मुंबई येथे होणाऱ्या विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत आयोजित शालेय जिल्हास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धा २ व ३ ऑक्टोबर रोजी रसायनी, मोहपाडा येथे पार पडली. या स्पर्धेत १९ वर्षे वयोगटातील मुलींच्या हॅमर थ्रो प्रकारात नियतीने १९.५० मीटर अंतरावर हॅमर फेकून अव्वल स्थान मिळवले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्येही मोठी क्रीडा क्षमता दडलेली आहे, याचे नियतीचे यश हे प्रेरणादायी उदाहरण ठरले आहे.



या यशाबद्दल माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. राजीव साबळे, स्कूल कमिटी चेअरमन नरेंद्र गायकवाड, संस्थेचे सदस्य आमदार अनिकेत तटकरे, नितीनशेठ बामगुडे, डॉ. आबासाहेब पाटणकर, अ‍ॅड. विनोद घायाळ, शिपुरकर आणि वाघरे इंग्रजी माध्यमाच्या शाळेचे चेअरमन अरुण पवार तसेच अशोकदादा साबळे विद्यालय व ज्युनिअर कॉलेजचे मुख्याध्यापक श्री. उभारे, उपप्राचार्य श्री. बिरादार, उपमुख्याध्यापक श्री. सोनावणे, पर्यवेक्षिका श्रीमती पुराणिकयांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# 'हिटमॅन'ने मोडला सचिनचा वर्ल्ड रेकॉर्ड

**मुंबई : प्रतिनिधी**



वेस्ट इंडिजविरुद्धच्या अखेरच्या वनडे सामन्यात टीम इंडियाचा सलामीवीर रोहित शर्माचे शतक अवघ्या आठ धावांनी हुकले, मात्र ९२ धावांच्या धमाकेदार खेळीसह त्याने मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरचा २२ वर्षांपासून अबाधित असलेला विश्वविक्रम मोडीत काढला. सचिनपेक्षा कमी डावांत रोहितने वनडेत सलामीवीर म्हणून १० हजार धावांचा टप्पा गाठला.

सचिन तेंडुलकरने २००४मध्ये ब्रिस्बेनच्या मैदानावर ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळताना सलामीवीर म्हणून १० हजार धावा पूर्ण केल्या होत्या. त्याने २१४ डावांत ही कामगिरी केली होती. रोहितने अवघ्या २०२ डावांत हा पराक्रम केला. सलामीवीर म्हणून वनडेत १० हजार धावांचा टप्पा गाठणारा रोहित हा क्रिकेट जगतातील चौथा फलंदाज ठरला आहे.

वेस्ट इंडिजविरुद्धच्या मालिकेआधी रोहित शर्मावर आगामी वनडे वर्ल्डकप २०२७ स्पर्धेत सलामीवीराच्या रुपात आपली दावेदारी भक्कम करण्याचा दबाव होता. पहिल्या डावात अपयशी ठरल्यावर रोहितने दुसऱ्या वनडेत शतकी खेळी केली. तिसऱ्या आणि अखेरच्या वनडे सामन्यात त्याने ८५ चेंडूत १० चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने ९२ धावांची खेळी करत आपल्यातील धमक पुन्हा एकदा दाखवून दिली आहे.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com